



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# श्रीगोंदा नगरपरिषदेच्या २२५ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास नगरपरिषद सभेमध्ये मंजुरी

श्रीगोंदा प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)




**नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती सुनीताताई खेतमाळीस यांच्या अध्यक्षतेखाली शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत प्रभावी आणि विधायक भूमिका भाजपाच्या नगरसेवकांनी मांडत शहराच्या विकासासाठी कार्यक्षम आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. या बैठकीत पारगाव रोड बायपास येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य स्मारकासाठी ५ कोटी रुपयांची व महात्मा फुले सर्कल बायपास येथे २ कोटी रुपयांची तरतूद करण्यास एकमताने मान्यता दिली.**

श्री. संत शेख महंमद महाराज देवस्थानच्या विकासासाठी तीर्थशेत्र पर्यटन योजनेअंतर्गत रु. १० कोटीची तरतूद करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. श्री. भैरवनाथ देवस्थान विकसित करण्यासाठी पर्यटन मध्ये तरतूद करण्यासाठी मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर अल्पसंख्यांक समाजाच्या विविध योजनासाठी ५ % राखीव निधीची तरतुद करण्यात आली शहरातील विविध चौकात सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे ऐतिहासिक वारसा असलेल्या महादजी शिंदे इमारत, विजयचौक झेंडावेस आणि दिल्ली वेस यांचे संवर्धन व सुशोभीकरण करणे शहरात संविधान भवन व बुद्धविहार उभारणे,, मौलाना आझाद अल्पसंख्यांक निधी मर्यादा वाढवणे,, इंदिरानगर, वेळू रोड सावित्रीबाई फुलेनगर , पेडगाव रोड सावंतवस्ती,, सोनवणेनगर,, गजाननगर येथील तसेच शहरातील विविध सरकारी जागेवरील लोकांना पक्के व हक्काचे घर देणे याचबरोबर शहर स्वच्छता,, सुरळीत पाणीपुरवठा दर्जेदार रस्ते,, ओपन जिम,, बगीचा सुशोभीकरण,, दिव्यांग बांधवाना विशेष तरतूद ,, घरकुल योजना ,, दिवाबत्ती ,,सौरऊर्जा प्रकल्प या सर्वच विषयांना मान्यता देण्यात आली या बैठकीसाठी उपनगराध्यक्ष अलकाताई अनभुले बांधकाम समिती सभापती कोमलताई बोरुडे ,,आरोग्य समिती सभापती प्रशांत गोरे ,, पाणीपुरवठा समिती सभापती शहाजी खेतमाळीस ,, महिला बालकल्याण समिती सभापती मीराताई शिंदे ,, नगरसेवक मछिंद्र शिंदे ,, राजेंद्र खेडकर ,, महावीर पटवा ,, आमीनभाई शेख नगरसेविका चांदणीताई खेतमाळीस,, वंदनाताई घोडके,, सोनालीताई गोरे ,, सुनीताताई घोडके,,अश्विनीताई काळे ,, मनीषाताई आनंदकर यांनी सुचवलेले रस्ते, ड्रेनेज, शाळा परिसर सुशोभीकरण आणि सामाजिक प्रश्न या सर्व मागण्यांना प्रधान्याने मंजुरी देण्यात आली यावेळी प्रशासनाच्या वतीने श्रीमती पुष्पगंधा भगत ( मुख्याधिकारी मॅडम ) यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला लेखापाल नन्नवरे मॅडम यांनी आपल्या कारकीर्दीतील पहिल्याच अर्थसंकल्पात शहराच्या या महत्त्वाकांक्षी गरजा अतिशय प्रभावीपणे मांडल्या असून, प्रशासन आणि सर्व नगरसेवकांच्या अभूतपूर्व समन्वयातून साकार झालेल्या या विकासक्षम अर्थसंकल्पातुन श्रीगोंदा शहराच्या प्रगतीची नवी दिशा निश्चित होईल तसेच शहर विकासासाठी आम्ही सर्वजण कटीबद्ध राहु असा विश्वास सभागृहास आहे

# डाळा बहीरोबा (ता. नेवासा) येथे ३० हजारांचा गावठी कट्टा जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई, तरुणावर गुन्हा दाखल!



नेवासा (अहिल्यानगर) (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात वडाळा बहीरोबा येथे गावठी कट्टा (अग्निशस्त्र) बाळगणाऱ्या एका तरुणावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत ३० हजार रुपये किमतीचा गावठी पिस्टल जप्त केला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली होती.

या पथकात राहुल द्वारके, दीपक घाटकर, लक्ष्मण खोकले, हृदय घोडके, सोमनाथ झांबरे, राहुल डोके व किशोर शिरसाठ यांचा समावेश होता. सदर पथक नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस ठाणे हद्दीत अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांची माहिती गोळा करत होते.

दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी गुप्त बातमीदारामार्फत पथकास प्रदीप मोहन जगधने (वय २१, रा. वडाळा बहीरोबा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) हा आपल्या कमरेला गावठी कट्टा लावून फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने हॉटेल संदिपच्या पाठीमागे सापळा रचला. संशयित इसम दिसताच त्यास ताब्यात घेण्यात आले.झडतीदरम्यान आरोपीकडून ३०,००० रुपये किमतीचे एक गावठी पिस्टल (अग्निशस्त्र) जप्त करण्यात आले. एकूण ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.या प्रकरणी किशोर आबासाहेब शिरसाठ (स्थानिक गुन्हे शाखा) यांच्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७२/२०२६ अन्वये आर्म अॅक्ट कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सोनई पोलीस ठाणे करीत आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# पारनेर तालुक्यात जावयाने सासऱ्याला संपवलं, नगर जिल्ह्यात खळबळ

(अहिल्यानगर) (समर्थ गांवकरी)

पत्नी गेल्या वर्षभरापासून नांदत नसल्याने आणि सासरे वारंवार वाद घालून सव्वा वर्षाच्या मुलीला मारून टाकण्याची धमकी देत असल्याच्या रागातून जावयाने सासर्याचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी शिवारातील डोंगर परिसरात घडलेल्या या खून प्रकरणाची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून जावयास त्याच्या मित्रासह अटक करण्यात आली आहे. दि. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास ढवळपुरी शिवारातील डोंगर परिसरात राम दास निवृत्ती सोनवणे (वय ५५, रा. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा अज्ञात व्यक्तीने गळा आवळून खून केल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी मयताचे भाऊ तुळशीराम निवृत्ती सोनवणे (रा. सुलतानपूर, ता. जुन्नर, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ तपास करून आरोपींना जेरबंद करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, अंमलदार अतुल लोटके, फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, अमृत आढाव, आकाश काळे, विशाल तनपुरे आदींचे विशेष पथक स्थापन करण्यात आले.

# कुरुंद्यात नाली बांधकामात 'महा-भ्रष्टाचार'चा स्फोट?

## कोट्यवधींचा निधी धोक्यात; नाल्यांना पडल्या भेगा, ग्रामस्थ संतप्त

हिंगोली प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)




वसमत तालुक्यातील कुरुंदा येथे पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या नाली बांधकामावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गावाला दरवर्षी त्रस्त करणाऱ्या पुराच्या पाण्यापासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने वसमत विधानसभेचे आमदार राजू भैय्या नवघरे यांनी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी आणून नदी खोलीकरण व नाली बांधकामाची कामे मार्गी लावली. मोठ्या अपेक्षांनी सुरू झालेले हे काम आता मात्र संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, गुत्तेदार व बांधकाम विभागातील संबंधित अधिकारी–इंजिनिअर यांच्या संगनमताने अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून काम उरकून घेतले जात आहे. नाली बांधकाम सुरू असतानाच सिमेंटचे प्रमाण कमी, वाळू–मुरूम दर्जाहीन आणि कॉंक्रीट कमकुवत असल्याचे दिसून येत आहे. इतकेच नव्हे, तर नुकत्याच झालेल्या बांधकाम ला ठिकठिकाणी मोठ्या भेगा पडू लागल्या असून काही ठिकाणी नाली सरळ न बांधता वाकडी–तिकडी करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

साध्या घराच्या बांधकामालाही भेगा पडत नाहीत, मग कोट्यवधींच्या नालीला एवढ्या लवकर तडे कसे? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. कामाबाबत वेळोवेळी संबंधित इंजिनिअरांना सूचना देऊनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप आहे. उलट, काम दर्जेदारच आहे, असे सांगून तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कुरुंदा सरपंचांनीही संबंधित विभागाकडे लेखी तक्रार करून काम दर्जेदार पद्धतीने करण्याची मागणी केली होती. मात्र त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने गावकऱ्यांचा रोष वाढला आहे. भविष्यात ही नाली पूरपाण्याचा तडाखा सहन करू शकेल का? की पहिल्याच पावसात कोसळून कोट्यवधींचा निधी पाण्यात जाईल? अशी भीती व्यक्त होत आहे.









# सत्ताधाऱ्यांनी निर्माण केलेल्या राजकीय परिस्थितीविरुद्ध लढणे अनेकांना अशक्य; शिवधनुष्य उचलत लोकशाहीची अब्रू राखणारा संघर्ष

किनवट / मुकुंद नेम्मानिवार
(समर्थ गांवकरी)

पौराणिक कथेनुसार भगवान शिव यांच्याकडे एक अतिशय शक्तिशाली व दिव्य धनुष्य होते. हे धनुष्य इतके प्रचंड व जड होते की ते साधारण देव, दानव किंवा मनुष्य यांच्याकडून उचलणेही शक्य नव्हते. राजा जनक यांना हे धनुष्य देवतांकडून प्राप्त झाले होते. त्यांनी ते आपल्या राजदरबारात अत्यंत पूजनीय वस्तू म्हणून ठेवले होते. राजा जनक यांनी आपल्या कन्या माता सीता हिच्या विवाहासाठी एक अट ठेवली होती, जो वीरयोध्दा हे शिवधनुष्य उचलून त्यावर प्रत्यंचा चढवेल, त्याच्याशी सीतेचा विवाह केला जाईल. अनेक बलाढ्य राजे व योद्धे या स्वयंवरात सहभागी झाले; परंतु कोणालाही हे धनुष्य उचलता आले नाही. शेवटी अयोध्येचे राजकुमार भगवान श्रीराम यांनी सहजपणे धनुष्य उचलले आणि प्रत्यंचा चढवताना ते धनुष्य तुटले. यामुळे श्रीरामांचे सामर्थ्य व दिव्यता सिद्ध झाली आणि सीतेचा विवाह त्यांच्याशी झाला.

आता इतिहासातील या प्रसंगाचा आणी किनवटच्या नगर परिषद निवडणुकीचा कसा संबध म्हणायचा झाला तर एकीकडे भारतीय जनता पक्ष, सत्ता, संघटन, नेतृत्व व कार्यकर्त्यांची व मतदारांची फळी, निवडणुकीची घोषणा, सर्वच इच्छुक आपाआपल्या परिने कामाला लागले, सर्व पक्षातील इच्छुकांची धडपड सुरु झाली. लोकशाही म्हणल्यावर निवडणुक हि चांगल्या हेतुने व टोकाची भुमिका घेऊन लढणे हेच अपेक्षित असतांना किनवट शहरातील ज्या ज्या प्रमुख उमेदवारांना मतदारांनी प्रमुख विरोधी उम `दवार हाच असे समजले तसे तसे ते उमेदवार एका, एका ने भुमिका बदलत माघारी फिरु लागले. ज्या प्रमाणे राजा जनक यांच्या स्वयंवर मध्ये एक एक योध्दा हे शिव धनुष्य पेलण्यास असमर्थ होऊ लागला तसे तसे किनवट शहरातील नगराध्यक्ष पदाचे एक एक उमेदवार आपली माघार जाहीर करु लागले. उरली सुरली कसर माजी नगराध्यक्ष साजिद खान ज्यांना मागील काळात नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असा समज होता त्यांनीच आपल्या विरोधी गटाशी हातमिळवणी करुन संपुर्ण शहरातील मतदार, नागरीक, राजकिय पक्षाचे नेते, कार्यकर्ते व पदाधिका-यांना बुचकळ्यात टाकले.

आता दिनांक १६ नोव्हेंबर म्हणजे निवडणुकी करिता नामांकन करण्याची १७ नोव्हेंबर ही शेवटची दिनांक अशा परिस्थितीत एका बाजुने नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निचीत असतांना दुस-या बाजुने उमेदवार कोण ? , शहरात मागील अनेक दशकापासुन सत्तेत असलेल्या वेलमा समाज, मुस्लीम समाज व धर्मनिरपेक्ष पक्षातील नेते, कार्यकर्ते हे अत्यंत दबावात असतांना अशा ओढावलेल्या गेलेल्या राजकिय परिस्थितीत शिवसेने युवा नेते करण येंड्रलवार यांनी आपल्या मातोश्री नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांना जेमतेम कार्यकर्ते व पदाधिका-या सह मिळले त्या परिस्थितीत विरोधी गटाचे उमेदवार म्हणुन जाहीर केले. (राजा जनक यांचे शिव धनुष्य उचलले) केवळ उचलले नाही तर त्या धनुष्याची प्रत्यंचा (दोरी) चढवली व ते धनुष्य तोडुन टाकले, म्हणजे ३९९६ एवढ्या प्रचंड मतांनी विजय प्राप्त केला.



करण येंड्रलवार,
युवा नेता,
शिवसेना,(उ.बा.ठा.),
किनवट/माहूर विधानसभा

हा विजय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित लोकशाहीचा एक सुंदर असा प्रत्यय होता कारण सत्ताधा-यांनी किनवट नगर परिषद निवडणुकीत अशी परिस्थिती निर्माण केली होती कि, निवडणुकीत मतदानापुर्वीच त्यांचा विजय होईल असे मानले जाऊ लागले होते. परंतु संविधान निम त्यांना अशी निवडणुक अपेक्षित नसुन त्यांना निर्भेळ, निभय व स्वच्छ मतदान प्रक्रीयेद्वारे लोकांनी निवडलेले लोकप्रतिनिधी सत्तेत बसले पाहिजे असे अपेक्षित असल्याने किनवट येथिल निवडणुकीतुन संविधान निर्मात्यांच्या अपेक्षा मतदारांना पुर्ण करता आल्या.

युवा नेते करण येंड्रलवार यांची शिवसेने प्रती असलेली निष्ठा ही त्यांच्या राजकीय प्रवासाची मुख्य ओळख आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावंत शिवसैनिक असलेले विनोद येंड्रलवार हे त्यांचे वडिल असुन वडिलांकडून त्यांना लहानपणापासूनच शिवसेनेचे बाळकडू मिळाले. त्यांच्या आई ह्या या गोकुंदा येथील शिवसेनेच्या जिल्हा परिषद सदस्या होत्या, त्यामुळे संघटनात्मक कार्य आणि पक्षनिष्ठा ही त्यांच्यात घरातूनच रुजली. शिवसेनेत फूट पडून दोन गट निर्माण झाल्यानंतर अनेकांनी राजकीय सोय पाहिली; मात्र करण येंड्रलवार यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची खंबीर साथ देत 'मशाल' चिन्हाशी निष्ठा कायम राखली. तरी २०१९ च्या विधानसभेत महायुती तथा २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी महाविकास आघाडीसाठी पूर्ण ताकदीने काम केले. २०२५ च्या नगर परिषद निवडणुकीत शहरात पक्षाची मजबूत संघटनात्मक ताकद नसताना, सत्ताधारी भाजपा व प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांची बळकट यंत्रणा असतानाही त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची साथ सोडली नाही आणि मशाल चिन्हासह नगराध्यक्ष निवडणुकीत प्रचंड मताधिक्क्याने विजय मिळवला. हा विजय त्यांच्या वैचारिक बांधिलकीचा आणि अखंड पक्षनिष्ठेचा पुरावा ठरला. एकंदरित, करण येंड्रलवार यांची शिवसेनेप्रती व ठाकरे घराण्याप्रती असलेली निष्ठा ही परिस्थितीनुसार बदलणारी नसून विचारांशी आणि नेतृत्वाशी असलेली दृढ बांधिलकी दर्शवणारी आहे.

भारतीय जनता पक्ष हा हिंदुत्ववादी विचारधारेवर आपले राजकारण करतो असे भाजपाच्या शिर्ष नेतृत्वाने नेहमीच विविध ठीकाणी आपल्या वक्तव्यातुन ठणकावुन सांगितले आहे. याच मुळे भारतीय राजकारणातील दोन धृव एक डावे किंवा धर्मनिरपेक्ष व दुसरे उजवे अशी विचारधारा असलेले विविध पक्ष आहेत.

तर किनवट निवडणुकीत उजवे हे पुर्ण ताकतीनिशी निवडणुक लढण्याच्या तयारीत असतांना डाव्या किंवा धर्मनिरपेक्ष विचारधारेच्या बाजुने एक प्रकारे लगान या हिंदी चित्रपटातील भारतीय संघा प्रमाणे शोभेल असे नवखे, तरुन व विस्तापित होते. त्यांचा हा लढा लढायचा कोणी जे कि, वरिल उदाहरणा प्रमाणे एक प्रकारे शिव धनुष्य उचलण्या सारखेच अवघड कृत्य होते. तोच लढा करण येंड्रलवार यांनी उचलला व त्यात विजयश्री खेचुन आणली. या सर्वांमध्ये एक बाजु प्रकर्षाने जाणवते ते म्हण्जे येथे डाव्या धर्मनिरपेक्ष बाजुकडील लोकांना पर्याय नसतांना करण येंड्रलवार यांने मशाल हि निशानी उपलब्ध करुन दिली व किनवट शहरात अनेक दशकापासुन सत्तेत असलेल्या मुस्लिम, वेलमा, दलित समुदयातील मतदारांना पर्याय उपलब्ध करुन दिला. यामुळे राजकारणातील जानकारांनी त्यास एक प्रकारे अब्रु वाचवली अशी उपमा दिली आहे. नुसती वाचवली नाही तर एक प्रबळ पर्याय उपलब्ध करुन दिला आहे. त्यामुळे भाविष्यातील राजकीय परिस्थिती व राजकारणाला एक वेगळी दिशा यातुन मिळणार आहे. असे काहींना वाटते.

# छत्रपती शिक्षण मंडळ, पडघा यांचा शिवशौर्यगाथेत सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक!

## मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन पोवाडा स्पर्धेत विद्यार्थ्यांची दिमाखदार कामगिरी

भिवंडी / मिलिंद जाधव (समर्थ गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा येथील छत्रपती शिक्षण मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन पोवाडा गायन स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत अभिमानास्पद यश संपादन केले आहे. शिवचरित्रावर आधारित – शिवशौर्यगाथा या विषयावर घेण्यात आलेल्या महाअंतिम फेरीत विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इतिहासातील शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेची गाथा पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत करत पडघा येथील नॅक मूल्यांकन प्राप्त कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार सादरीकरण केले.

या विजयी पथकात प्रमुख गायिका कु. आरती संताजी जाधव हिच्यासह हर्षिता पाटील, वैष्णवी भोईर, तेजस्विनी सावंत, जतीन साळवी, सुमित जाधव यांनी सहगायन केले. ढोलकी वादनाची जबाबदारी राहुल डवले यांनी समर्थपणे सांभाळली. संपूर्ण सादरीकरणात आवाजातील ताकद, लयबद्धता आणि ऐतिहासिक संदर्भांची अचूक मांडणी यामुळे परीक्षकांनी मंडळाला प्रथम क्रमांक बहाल केला.

या यशामागे प्राध्यापिका नीता भोईर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांनी विद्यार्थ्यांना पोवाड्याची परंपरा, उच्चारांची शुद्धता आणि रंगमंचावरील आत्मविश्वास याबाबत विशेष प्रशिक्षण दिले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत




सुप्रसिद्ध लोकशाहीर यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. सलग दुसऱ्या वर्षी मिळालेल्या या यशामुळे छत्रपती शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



णठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेस महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, सुरक्षा अधिकारी घनश्याम फर्डे, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी कर्म्चारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियन शहापूर तालुका अध्यक्ष .लक्ष्मण महाळुंगे यांची तर उपाध्यक्ष श्रीम.माधुरी राठोड, सचिव पदावर श्री.संजय पोंढेकर, यांची निवड



शहापूर (समर्थ गांवकरी)

पंचायत समिती शहापूर येथे मा.गट विकास अधिकारी (उ.श्रे.) श्री.बी.एच.राठोड साहेब, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियन ११६०१ अर्थात ४३४० चे जिल्हा अध्यक्ष श्री.गजानन विशे तसेच मा.सहा.प्रशासन अधिकारी श्री.अजय भोंडिवले यांच्या अध्यक्षेतेखाली पंचायत समिती शहापूरची कार्यकरणी नव्याने स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियन ११६०१ अर्थात ४३४० चे तालुका अध्यक्ष पदावर श्री.लक्ष्मण महाळुंगे यांची नेमणुक करण्यात आली तर उपाध्यक्ष श्रीम.माधुरी राठोड, सचिव पदावर श्री.संजय पोंढेकर, यांची निवड करण्यात आली. तसेच कार्याध्यक्ष श्री.महेश बागराव व श्री.शशिकांत सपाट, खजिनदार श्रीम.पुनम भेरे, सहसचिव श्री.रविंद्र पवार, प्रसिद्धी प्रमुख श्री.निलेश विशे, संपर्क प्रमुख श्री.पद्माकर राठोड व श्री.विकास मेतकर, सल्लागार श्री.रमेश लोभी, श्रीम. चित्रा जगताप व श्रीम.अलका चव्हाण, संघटक श्री.सदानंद सोनारे, यांची निवड करण्यात आली.

वरील प्रमाणे कार्यकारणी सर्वानुमते निवड करण्यात येऊन सर्वानुमते मंजूर करण्यात आली.कार्यकारणी तयार करण्यासाठी पंचायत समिती शहापूरच्या कर्मचाऱ्यांनी मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला.


कर्मचा-यांच्या वेतनत्रुटी तसेच पदोन्नती स्तर कमी करणेकरिता जिल्हा तसेच राज्य स्तरावर पाठपुरावा करुन जिव्हाळयाचे प्रश्न सोडविण्याबाबत चर्चा करुन पुढील दिशा ठरविण्यात आली.तद्नंतर वरिष्ठांनी मनोगत व्यक्त करुन मोलाचे मार्गदर्शन केले व सर्वाचे आभार व्यक्त करुन सभा समाप्त करण्यात आली.

# शिशिरात बहरणारा सायरी वृक्ष; आदिवासी भागातील बहुउपयोगी नैसर्गिक संपदा!

(समर्थ गांवकरी)

डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून फेब्रुवारी अखेर आणि मार्चच्या पहिल्या पंधरवड्यात शिशिर ऋतूमध्ये डोंगराळ व आदिवासी भागात आढळणारा काटेरी सायरी (गुलतुरी/टणटणी) वृक्ष फुलांनी बहरून निसर्गाला आगळेवेगळे रूप देतो. पानगळ झाल्यानंतर या झाडाला गडद लाल, फिकट लाल आणि गुलाबी रक्तवर्णी अशी आकर्षक फुले येतात. फुलोऱ्याच्या काळात झाडावर एकही पान नसते; फक्त लालसर फुलांचा साज चढलेला असल्याने हे झाड दूरवरूनही उठून दिसते.

फुले गळून गेल्यानंतर त्यापासून कळ्या तयार होतात. या कळ्यांपासून पुढे फळ तयार होते. पूर्ण पिकलेल्या फळाचे कवच फुटल्यानंतर त्यामधून कापूस बाहेर पडतो. या कापसाच्या टोकाशी असलेली बी वाऱ्यावर उडून







इतरत्र पसरते. पावसाळ्यात या बियांपासून नवीन रोपे उगवतात. योग्य परिस्थितीत हा वृक्ष साधारण ४० ते ५० फूट उंच वाढतो आणि तोड न केल्यास ५० ते ६० वर्षांपर्यंत जगू शकतो.

सायरीचे लाकूड मात्र फारसे टिकाऊ नसल्याने त्याचा उपयोग प्रामुख्याने सरपणासाठीच केला जातो. झाडाच्या फांद्या लवचिक नसल्याने जास्त वजन सहन करू शकत नाहीत. त्यामुळे इतर झाडांप्रमाणे त्यावर चढणे धोकादायक ठरते.

तथापि, या झाडाचा पाला जनावरांसाठी उपयुक्त ठरतो. पावसाला उशीर झाला आणि चारा टंचाई निर्माण झाली तर शेतकरी सायरीचा पाला तोडून जनावरांना खाऊ घालतात. नव्या गवताची वाढ सुरू झाल्यानंतर हा पाला देणे थांबवले जाते. त्यामुळे दुष्काळी काळात सायरी जनावरांसाठी आधारवड ठरते.

सायरीच्या काट्यांमध्ये 'कात'सारखे गुणधर्म आढळतात. ग्रामीण भागात पान–चुना उपलब्ध नसल्यास काही ठिकाणी सायरीचा काटा दगडाने ठोकून त्याचा तुकडा करून, टणटणीच्या पानाला चुना लावून पारंपरिक पद्धतीने सेवन केले जाते. यामुळे तोंड लालभडक होते व थंडावा मिळतो, असा स्थानिकांचा अनुभव आहे.

फुलांपासून तयार होणाऱ्या कळ्यांना 'सायधोडे' असे म्हणतात. या कळ्यांची भाजी केली जाते. ही भाजी पौष्टिक मानली जाते व शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. काही ठिकाणी सायधोडे चिरून वाळवून साठवले जातात, जेणेकरून पावसाळ्यातही त्यापासून भाजी बनवता येते.

डोंगराळ व आदिवासी पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर आढळणारा सायरी वृक्ष औषधी, पशुखाद्य व स्थानिक अन्नपरंपरेत महत्त्वाचे स्थान राखून आहे. निसर्गसंपदेतील हा बहुउपयोगी वृक्ष जतन करणे काळाची गरज असल्याचे मत पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले आहे.

# ढोकेश्वर येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

पारनेर/ प्रतिनिधी

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात ज्येष्ठ चित्रपट गीतकार, अभिनेते, पटकथा व संवाद लेखक मा. श्री. बाबासाहेब सौदागर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या पत्नी अभिनेत्री सौ. कविता सौदागर यांच्यासह त्यांनी कार्यक्रमाला शोभिवंत केला.

बाबासाहेब सौदागर हे मराठी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम व्यक्तिमत्त्व असून, त्यांनी ८० हून अधिक चित्रपटांसाठी गीतलेखन केले आहे. 'मी सिंधुताई सपकाळ', 'शिवा', 'राजमाता जिजाऊ' अशा अनेक चित्रपटांसाठी त्यांनी गाणी लिहिली आहेत. तसेच अनेक मालिका, नाटके आणि चित्रपटांमध्ये अभिनयही केला आहे. त्यांना कवीश्रेष्ठ ग.दि. माडगूळकर सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कारासह अनेक सन्म ान मिळाले आहेत. निसर्गकवी म्हणूनही ते ओळखले जातात.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते व्यासपीठाची पूजा झाली. विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य व इतर कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले, ज्याने उपस्थितांची मने जिंकली.

प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सिताराम खिलारी यांनी गुणवंत प्राध्यापक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करून महाविद्यालय व संस्थेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.

बाबासाहेब सौदागर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून मार्गदर्शन करताना सांगितले, शैक्षणिक वर्षात गुण कमी मिळाले तरी नाराज होऊ नका. तुमच्यातील कलागुण ओळखा. प्रत्येकामध्ये काही ना काही कलाकार दडलेला असतो. त्याला ओळखून पुढे जा. शैक्षणिक यशाबरोबरच कलागुण विकसित केल्यास जीवन समृद्ध होते. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये नवउत्साह निर्माण झाला.

समारंभात शैक्षणिक गुणवंत विद्यार्थी, क्रीडा स्पर्धांतील विजेते, विविध सांस्कृतिक व इतर स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. गुणवंत प्राध्यापकांचेही विशेष अभिनंदन झाले.

कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी वर्षभरातील विविध विभागातील उपक्रमांचा अहवाल सादर केला. क्रीडा अहवाल प्रा. अनुराधा गायके व प्रा. दिव्या शीलवंत यांनी वाचला. सूत्रसंचालन डॉ. विश्वास गवारी, प्रा. संकेत ठाणगे, डॉ. जिजाभाऊ घुले व प्रा. रेश्मा सोनावणे यांनी केले. आभार प्रा. वीरेंद्र धनशेट्टी यांनी मानले.

याप्रसंगी कला शाखा प्रमुख डॉ. विजय सुरोशी, विज्ञान शाखा प्रमुख प्रा. नामदेव वाल्हेकर, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. सुदाम वीर, एन.सी.सी. प्रमुख प्रा. शांता गडगे, कार्यालय प्रमुख श्री. सावकार काकडे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम केवळ स्नेहसंमेलन नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा उत्सव ठरला. अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयातील सांस्कृतिक व शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध होत असल्याचे दिसून आले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# विज्ञान म्हणजे फक्त अभ्यासक्रम नाही,तर विचार करण्याची वैज्ञानिक पद्धत आहे

जुन्नर /रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)

माशेलकर – स्वरूप स्पेस अँड इनोवेशन सेंटर( MSSIC ) नारायणगाव यांचे वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त शास्त्रज्ञ,संशोधक ,जागतिक व्याख्याते व शिक्षण तज्ञ , आंतरराष्ट्रीय –राष्ट्रीय ,राज्य पुरस्कार प्राप्त प्राध्यापक डॉक्टर प्रतिक मुणगेकर यांचे विज्ञान व्याख्यान आयोजित केले होते.यावेळी त्यांनी १४५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

डॉक्टर प्रतिक मुणगेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की मला जागतिक ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉक्टर रघुनाथ माशेलकर सरांसारखे गुरु मिळाले त्यामुळे मला माझे संशोधन कार्य पूर्ण करता आले. आपल्याला आपलं ध्येय साध्य करत असताना परिस्थिती कधीही अडसर ठरत नाही त्यासाठी मेहनत ,जिद्द ,सचोटी आणि स्वतःवर आत्मविश्वास असावा लागतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे जागतिक शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर आहेत. वाचन वाढवा .फक्त भोकमपट्टी न करता स्मार्ट वर्क करा.आपल्याकडे जे ज्ञान आहे ते उपयोगात आणता आलं पाहिजे.कामात आपल्या अचूकता व सातत्य असायला हवे. स्वतःचे सर्व छंद जोपासून दररोज एक तास अभ्यास करता आला पाहिजे.शाळेत आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व उपक्रमां मध्ये सहभागी व्हा त्यामुळे आपला मेंदू अधिक विकसित होतो.अभ्यासामध्ये सराव व उजळणी गरजेचे आहे. ज्ञान हे न संपणार आहे ते आपण सतत आत्मसात करत राहिलं पाहिजे. माझ्या मते मला जे वाटतं ते मला करता आलं पाहिजे यालाच यश म्हणतात.अभ्यास करा,शिक्षकांना प्रश्न विचारा , शिक्षकांवर श्रद्धा ठेवा.पूर्वी पास होणे अवघड असे परंतु आता नापास होणे अवघड झाले आहे.स्वप्न मोठी पहा काम शांततेत करा . नक्कल करू नका .दुसऱ्याला प्रोत्साहन द्या . अपयश आले तर हार मानू नका असा मोलाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

याप्रसंगी ग्राम विकास मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे माशेलकर स्वरूप स्पेस अँड इनोव्हेशन सेंटर नारायणगाव चे उपाध्यक्ष डॉक्टर तानाजी वामन जुन्नर तालुका विज्ञान अध्यापक संघाचे माजी अध्यक्ष व लेखक रतिलाल बाबेल,राजेंद्र डुंबरे , रघुनाथ तांबे,कल्पेश जाधव, प्रदीप गाढवे,पंकज घोलप, शांताराम पानसरे,राजश्री भालेकर,संजय हिरे,अजित डांगे,भगवंता घोडे,मंगेश तांबे,संतोष कांबळे,अमित झरेकर,सोनाली माळवे,शिल्पा भालेराव,वनिता भोर,आसावरी गायकर,सोनाली कांबळे,लक्ष्मण दुडे,बाळासाहेब साबळे,देवचंद नेहे,अनिल जवरे,दिनेश ताठे , रंजीता पाटील,सरस्वती भताने, रसिका शेळके,अश्विनी नलावडे, निर्मला डोंगरे,ईश्वर ढमाले, अरविंद आंबरे आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल चौधरी व सूत्रसंचालन मिलिंद खेत्री यांनी केले,आभार प्रदीप गाढवे यांनी मानले.







# कत्तलीसाठी आणलेल्या २० गोवंशांची सुटका; श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनची मोठी कारवाई!

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)







अहिल्यानगर जिल्ह्यात गोवंशहत्याबंदी कायद्याची कडक अंमलबजावणी सुरू असताना श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने कत्तलीसाठी निर्दयपणे बांधून ठेवलेल्या २० गोवंशीय जनावरांची सुटका करत मोठी कारवाई केली. या कारवाईमुळे जनावरांना अक्षरशः जीवदान मिळाले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात कोणत्याही परिस्थितीत गोवंशांची कत्तल होऊ नये, अशा कडक सूचना सर्व प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन देशमुख अवैध धंद्यांची माहिती घेत असताना बुधवारी रात्री गुप्त माहिती मिळाली की, वॉर्ड क्रमांक ०२, श्रीरामपूर येथील जाफर शकूर कुरेशी यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये काही गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने चारा–पाण्याविना बांधून ठेवण्यात आली आहेत.

या माहितीनुसार सपोनि शिखरे, पोसई चांगदेव हंडाळ, पोलीस कॉन्स्टेबल अमोल बाबुराव गायकवाड, पोकॉ शिवाजी बडे, अमोल पडोळे व अजित पठारे यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाड टाकली. रात्री सुमारे २०:१५ वाजता छापा टाकण्यात आला असता २० जर्शी गायी व वासरे चारा–पाण्याविना निर्दयीपणे बांधून ठेवलेली आढळून आली. पोलिसांची चाहूल लागताच संबंधित शेडमालक जाफर शकूर कुरेशी हा अंधाराचा फायदा घेत पळून गेला.

पोलिसांनी पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करून अंदाजे ७ लाख ५० हजार रुपयांच्या किंमतीची ११ जर्शी गायी व ९ वासरे जप्त केली. त्यानंतर सर्व जनावरे सुरक्षितरित्या पोलीस ठाण्यात हलविण्यात आली.

या प्रकरणी जाफर शकूर कुरेशी (रा. नवी दिल्ली, वॉर्ड क्र. ०२, श्रीरामपूर) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ (सुधारित २०१५) मधील कलमे ५, ५(ब), ९ तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० मधील कलम ११(च), ११(ज)(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या धाडसी कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून गोवंश संरक्षणाबाबत पोलिसांची सतर्कता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व महाआवास अभियानांत ठाणे जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

ठाणे (समर्थ गांवकरी)

संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या विचारांवर आधारित संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत सन २०१८–१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२ तसेच २०२२–२३ या वर्षांतील स्पर्धेत निवड झालेल्या ग्रामपंचायतींच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम विभागीय आयुक्त, कोंकण विभाग डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सिडको कार्यालय सभागृह, सातवा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे संपन्न झाला.

जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना यावेळी गौरविण्यात आले. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत सन २०२२–२३ या वर्षातील विभागस्तरीय स्पर्धेमध्ये ग्रामपंचायत वडपे (ता. भिवंडी) यांनी द्वितीय क्रमांक पटकावत सन्मानचिन्ह व रुपये ९ लाखांचा धनादेश प्राप्त केला. तसेच ग्रामपंचायत जांभूळ (ता. कल्याण) यांनी तृतीय क्रमांक मिळवून सन्मानचिन्ह व रुपये ७ लाखांचा धनादेश प्राप्त केला.

पुरस्कारांचे वितरण विभागीय आयुक्त, कोंकण विभाग आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी नियोजन, लोकसहभाग व ग्रामस्तरावरील जनजागृती या बाबींमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल संबंधित ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला.याच कार्यक्रमात महा आवास अभियान २०२३–२४ अंतर्गत राज्य पुरस्कृत घरकुल योजना प्रभावीपणे राबविल्याबद्दल सर्वोत्कृष्ट जिल्हा – तृतीय क्रमांक हा पुरस्कार जिल्हा परिषद ठाणे यांना प्रदान करण्यात आला. राज्य पुरस्कृत आवास योजना २०२३–२४ अंतर्गत मानीवली ग्रामपंचायतीला तृतीय पारितोषिक मिळाले. घरकुल बांधकामाची गती, पारदर्शक अंमलबजावणी व लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा प्रभावी लाभ पोहोचविल्याबद्दल हा सन्मान देण्यात आला.या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छ विभाग) पंडित राठोड तसेच सर्व गट विकास अधिकारी आणि संबंधित अधिकारी–कर्मचारी यांच्या टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.कार्यक्रमास अप्पर आयुक्त (विकास) कोकण भवन डॉ. माणिक दिवे, संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण राजाराम दिघे, व्याख्याते प्रशांत देशमुख, अतिरिक्त सहाय्यक आयुक्त सिद्धराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रायगड नेहा भोसले, जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी आरती गगे, शालेय आरोग्य व स्वच्छता सल्लागार जिल्हा परिषद ठाणे सारिका देशमुख, पाणी व स्वच्छता सल्लागार जिल्हा परिषद ठाणे स्नेहल सोनवणे, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) ता. कल्याण पराग भोसले, ग्रामपंचायत अधिकारी वडपे भालचंद्र पवार, सरपंच वडपे प्रेमनाथ वाडोलकर, तात्कालीन सरपंच जांभूळ परीक्षित पिसाळ, तात्कालीन ग्रामपंचायत अधिकारी जांभूळ राजाभाऊ सुरवशे, ग्रामपंचायत अधिकारी जांभूळ अश्विनी यशवंतराव, उपसरपंच जांभूळ अक्षय सावंत, तंटामुक्ती अध्यक्ष वडपे सुनील पाटील, माजी सरपंच वडपे शशिकला पाटील, सरपंच मानिवली सुकन्या गायकर, ग्रामपंचायत अधिकारी मानिवली स्वाती शेलार तसेच ग्रामपंचायत कर्मचारी मानिवली सुरेश गायकर आणि जिल्हा परिषद ठाणेचे इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छता व ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात ठाणे जिल्ह्याने सातत्यपूर्ण व प्रभावी कामगिरी करत राज्य व विभागीय स्तरावर मानाचे स्थान मिळविल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. भविष्यातही अशाच प्रकारे लोकसहभागातून विकासकामे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.





# बोटा येथे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न



बोटा (समर्थ गांवकरी)

विद्या निकेतन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर यांच्या वतीने आर्टिफिशियल इंटेलिजेंस व नियामक अनुपालन : फार्मास्युटिकल आणि हेल्थकेअर इंडस्ट्रीतील परिवर्तन या समकालीन विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. औषधनिर्माण व आरोग्य क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) मुळे होत असलेल्या बदलांचा तसेच नियामक अनुपालन प्रक्रियेतील डिजिटल परिवर्तनाचा सर्वांगीण आढावा या परिषदेत घेण्यात आला. देशभरातील प्राध्यापक, संशोधक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील फार्मसी विभागाचे अधिष्ठाता डॉ. विशाल पांडे, संदीप विद्यापीठ, नाशिक येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. सुमित देवरे,डॉ. संदीप हापसे, डॉ. सतीश पोलशेट्टीवार, श्री. विलास सावंत, डॉ. अविनाश ठाणगे व डॉ. अक्षय खैरनार यांनी मार्गदर्शन केले.

मान्यवरांनी ख आधारित नियामक अनुपालन, डेटा इंटिग्रिटी, ऑटोमेशन, रिस्क–बेस्ड मॉनिटरिंग आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या विषयांवर सखोल विवेचन केले. औषध उद्योगातील बदलत्या तंत्रज्ञानामुळे संशोधन, गुणवत्ता हमी व नियामक प्रक्रियेत नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी तांत्रिक सत्रे, संशोधनाधारित व्याख्याने, शोधनिबंध सादरीकरण व पोस्टर प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले. शोधनिबंध व पोस्टर सादरीकरणासाठी डॉ. विजयकुमार वाकळे, डॉ. तुषार डुकरे, डॉ. शीतल गोसावी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्याचे शास्त्रीय मूल्य, नावीन्यपूर्णता व सादरीकरण कौशल्य यांच्या आधारे सखोल परीक्षण केले. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेचे सल्लागार श्री. बी. जी. शेखर पाटील, सचिव श्री. राम दास पोखरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विद्युलता शेखर पाटील, समन्वयक डॉ. आदित्य शेखर पाटील तसेच कॅम्पस डायरेक्टर दीपक रहाणे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

परिषदेच्या यशस्वी आयोजनामागे प्राचार्य डॉ. किरण शिंदे व संपूर्ण शिक्षकवृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ही परिषद शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील दुवा अधिक बळकट करणारी ठरली असून, औषधनिर्माण व आरोग्य क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापराला नवी दिशा देणारी ठरली. विद्यार्थ्यांनी परिषदेमुळे संशोधनाची प्रेरणा व उद्योगातील आधुनिक प्रवाहांची सखोल माहिती मिळाल्याची भावना व्यक्त केली.



# चाईल्ड फंड संस्थेच्या मार्फत पंचायत राज सदस्यांची पुणे वेधशाळेस अभ्यास सहल

जुन्नर / रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)

चाईल्ड फंड इंडिया या संस्थेतर्फे पंचायत राज चाईल्ड फंड इंडिया या संस्थेतर्फे बुधवार दिनांक बुधवार दि:–२५ फेब्रुवारी रोजी पुणे वेधशाळा येथे अभ्यास सहल यशस्वीरित्या पार पडली.या सहलीसाठी शितळेश्वर विद्यालय सितेवाडी या विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष हांडे,विद्यालयातील इ:–९ वीतील ०६ विद्यार्थिनी,सितेवाडी ग्रामपंचायतच्या सरपंच दिपाली पाटेकर,मढ हायस्कूलचे मुख्याध्यापक राणे सर,राणे मॅडम,मढ ग्रामपंचायतच्या सरपंच मस्करे,पारगाव ग्रामपंचायतचे सरपंच दत्तात्रय ढेंगळे,खुबी–करंजाळे ग्रामपंचायतचे सरपंच विजय काठे,देवळे ग्रामपंचायतचे सरपंच दिपक घुटे त्यांचे सदस्य,शेतकरी प्रतिनिधी,पेसा प्रतिनिधी व चाईल्ड फंड संस्थेचे ओडिशा येथील स्टाफ,तसेच जुन्नर येथील मुक्ता गिरी,अजित सौर, विश्वास गालफाडे,मंगेश आतकर,शहाजी कसबे, रामदास दाभाडे,प्रविण जगताप, व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते. यांनी पुणे येथिल India Meteorological department कार्यालय व केंद्रीय कृषी वेधशाळेस भेट देऊन तेथील कार्याची वल उपकरणांची माहिती घेतली.या भेटीचे नियोजन व मार्गदर्शन चाईल्ड फंड सिनियर ऑफिसर . अभिजित मदने व दिल्ली येथील पूनम मिश्रा यांनी केले.या भेटीचा विद्यार्थ्यांना,आणि शेतकऱ्यांना नक्कीच फायदा होईल अशी प्रतिक्रिया सरपंच, शेतकरी, शिक्षक व विद्यार्थी यांनी व्यक्त केली.अशी माहिती चाईल्ड फंड इंडिया जुन्नर प्रमुख अभिजीत मदने यांनी दिली.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१२/२०२५ अकोले दि. २६/०२/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. सुनिल विठ्ठल हुलवळे, रा.जांभळे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे वडील कै. विठ्ठल उर्फ विठोबा भाऊ हुलवळे यांचा मृत्यू दि. २८/०८/१९९२** रोजी **मौजे मन्याळे** येथे झाला असुन त्यांच्या **वडीलांच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मन्याळे**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. सुनिल विठ्ठल हुलवळे, रा.जांभळे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे वडील कै. विठ्ठल उर्फ विठोबा भाऊ हुलवळे यांचा मृत्यू दि. २८/०८/१९९२** रोजी **मौजे मन्याळे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मन्याळे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २६/०२/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/१७/२०२६ अकोले दि.२४/०२/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. स्वाती पांडुरंग चौधरी, रा.कळंब**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वतःचा स्वाती पांडुरंग चौधरी यांचा जन्म दि. २६/०१/१९८३ रोजी मोग्रस** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मोग्रस** , ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. स्वाती पांडुरंग चौधरी, रा.कळंब**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वतःचा स्वाती पांडुरंग चौधरी यांचा जन्म दि. २६/०१/१९८३ रोजी मोग्रस** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **मोग्रस**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २४/०२/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

ज्या अर्थी वादी संतुजी आनंदा धुमाळ ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या, अकोले ता. अकोले जि. अ.नगर यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द या कार्यालयात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील तक्यातील प्रतिवादी / जामीनदार यांचे विरुध्द वसुली प्रमाणपत्र मिळणेकामी दावा दाखल करुन वसुली प्रमाणपत्राची मागणी केली आहे. ज्या अर्थी प्रतिवादी यांना यापुर्वी कार्यालयाने दि. ४/२/२०२६ व दि. १७/२/२०२६ रोजी रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवुन सुनावली देवुनही ते गैरहजर राहिले आहे.

| अ.नं. | नाव | दावा क्रमांक | दावा रक्कम | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पंडीत किसन आवारी (कर्जदार)<br>श्री. अमोल सुरेश वैद्य (जामीनदार)<br>श्री. सदाशिव जयराम गायकवाड (जामीनदार) | १७५/२६ | २३६४८३ | |
| २ | श्री.लक्ष्मण रंगनाथ चौधरी (कर्जदार)<br>श्री. बाळासाहेब मुरलीधर सहाणे (जामीनदार)<br>श्री. सुभाष लहानु वाळुंज (जामीनदार) | १७१/२६ | ६८५५३ | |
| ३ | श्री. पांडुरंग राजाराम सोनवणे (कर्जदार)<br>सौ. अलका कोंडीबा पवार (जामीनदार)<br>श्री. माधव गबाजी कुमकर (जामीनदार) | १७३/२६ | २५२४२ | |
| ४ | श्री. गोरख बन्सी कदम (कर्जदार)<br>सौ. शैला भरत धुमाळ (जामीनदार)<br>श्री. मच्छिंद्र बन्सी कदम (जामीनदार) | १६९/२६ | ३३२०१ | |
| ५ | श्री. प्रकाश जिजाबा जंगले (कर्जदार)<br>सौ. अपर्णा संजय मैड (जामीनदार)<br>श्री. रोहिदास त्र्यंबक कोटकर (जामीनदार) | १६८/२६ | ७३८७३ | |
| ६ | श्री. मोहन माधव दातीर (कर्जदार)<br>सौ. अलका कोंडीबा पवार (जामीनदार)<br>श्री. गोरख भाऊ आरोटे (जामीनदार) | १७२/२६ | ५५८५५ | |
| ७ | सुजाता महेश पाबळकर (कर्जदार)<br>श्री. इस्माईल अहमद मणियार (जामीनदार)<br>श्री. ईश्वर सहादु आरोटे (जामीनदार) | १७६/२६ | १३२२३५ | |
| ८ | श्री. राधाकिसन हरिभाऊ दातखिळे (कर्जदार)<br>सौ. अलका कोंडीबा पवार (जामीनदार)<br>श्री. सुदाम हरिभाऊ दातखिळे (जामीनदार) | १७८/२६ | ४६७४१ | |
| ९ | श्री. विद्याचंद्र राजाराम सातपुते (कर्जदार)<br>श्री. अमोल सुरेश वैद्य (जामीनदार)<br>श्री. भरत मुरलीधर धुमाळ (जामीनदार) | १७७/२६ | ९१३३५ | |
| १० | श्री. प्रविण शांताराम भोर (कर्जदार)<br>सौ. अलका कोंडीबा पवार (जामीनदार)<br>श्री. सचिन भिमराज देशमुख (जामीनदार) | १७०/२६ | २७२२० | |
| ११ | श्री. भिमाशंकर शिवराम भारमल (कर्जदार)<br>सौ. अलका कोंडीबा पवार (जामीनदार)<br>श्री. देवराम रघुनाथ धुमाळ (जामीनदार) | १७४/२६ | ३०२४० | |
| १२ | श्री. मच्छिंद्र बन्सी कदम (कर्जदार)<br>सौ. शैला भरत धुमाळ (जामीनदार)<br>श्री. गोरख बन्सी कदम(जामीनदार) | १६७/२६ | ५२५४७ | |

तरी प्रतिवादी / जामीनदार यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने सुनावणी कामी पुन्हा एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि. १०/३/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता सहाय्यक निबंधक सह संस्था अकोलेचे त्रिमुर्ती कॉम्प्लेक्स सीड फार्म कोल्हार घोटी रोड आभाळे कॉम्प्लेक्स अकोले ता. अकोले जि. अहिल्यानगर आपण दि. १०/०३/२०२६ रोजी दुपारी २.०० वा या कार्यालयात सुनावणी कामी हजर रहावे. सदर दिवशी हजर न राहिल्यास आपले काहीही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन उपलब्ध कागदपत्राचे आधारे योग्य ती कार्यवाही केली जाईल यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी

शिक्का

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

# २८ फेब्रुवारी रोजी वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन

## पुरस्कार, सन्मान व चर्चासत्रांचा समावेश

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वाशिम येथील वैकुंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनम चंद सोमाणी परिसर, वाटाणे लॉन येथे २७ वे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार वितरण व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांनी दिली.

स्थानिक वाटाणे लॉन येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पत्रकार संमेलनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. सहउद्घाटक म्हणून महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहतील, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे राहणार आहेत. विशेष आशीर्वाद उपस्थिती म्हणून अयोध्या मंदिराचे कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पू. रमाकांत व्यास उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष राजू भांदुर्गे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य संघटक संजय भोकरे, डिजिटल मीडिया अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष महेश पानशे, किशोर रायसाकडा, अशोक देडे, डॉ. अभय कुमार दांडगे, संपर्क प्रमुख वैभव स्वामी, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे, विदर्भ प्रमुख नयन मोंढे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरटे, नागपूर विदर्भ प्रमुख अनुपम कुमार भार्गव यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच विशेष अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. आकाश फुंडकर, कॅबिनेट मंत्री ना. संजय राठोड, विभागीय अध्यक्ष सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार जाहीर

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने यंदाचे उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार २०२५-२६ जाहीर करण्यात आले आहेत. त्यामध्ये पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे :

श्री. किशोर रायसाकडा (प्रदेश उपाध्यक्ष, पाचोरा – जळगाव) – उत्तर महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक

श्री. नयन मोंढे (अमरावती) – विदर्भ अध्यक्ष, उत्कृष्ट संघटक

श्री. राकेश खराडे (रायगड जिल्हाध्यक्ष) – कोकण विभाग उत्कृष्ट संघटक

श्री. शंकर बोरघरे (चंद्रपूर-गडचिरोली जिल्हाध्यक्ष) – उत्कृष्ट संघटक

श्री. अनुपम कुमार भार्गव (वर्धा) – नागपूर विदर्भ उत्कृष्ट संघटक

श्री. वैभव स्वामी (प्रदेश संपर्कप्रमुख, बीड) – मराठवाडा उत्कृष्ट संघटक

गणेश देवगावकर (जिल्हाध्यक्ष, सोशल मीडिया – वाशिम) – उत्कृष्ट संघटक

नागेश आदापुरे (पंढरपूर) – पश्चिम महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक

मा. दशरथ चव्हाण (जिल्हाध्यक्ष, नवी मुंबई) – उत्कृष्ट संघटक

मा. पोपटराव गवांदे (इगतपुरी, नाशिक जिल्हा) – उत्कृष्ट संघटक

या सर्व मान्यवरांना अधिवेशनात सन्मानित करण्यात येणार आहे.

चर्चासत्रे व प्रबोधन सत्रांचे आयोजन

दुपारी २ ते ३ या वेळेत पत्रकारांचा डीएनए काय? व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण होत आहे का? या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये राज्य संघटक सिद्धार्थ भोकरे, ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे, प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकोडे आणि प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे सहभागी होणार आहेत. चर्चासत्राचे संचालन प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी करतील.

दुपारी ३ ते ४ दरम्यान पदाधिकारी सन्मान सोहळा पार पडणार असून ४ ते ५ या वेळेत द्वितीय प्रबोधन सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे सायबर युगातील माध्यमे आणि मूल्यनिष्ठ पत्रकारिता या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

प्रबोधन सत्राचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी ड. सौ. भारती सोमाणी, प्रमुख अतिथी सौ. वृषाली टेकाळे राहतील. संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर प्रचार प्रमुख गोपाल कडू मार्गदर्शन करणार आहेत. सभाध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज वाघ, उद्घाटक दामोदर पाटील गुरजी आणि विशेष अतिथी बाबाराव पाटील उपस्थित राहणार आहेत.

मान्यवरांचा सन्मान व उपस्थितीचे आवाहन

कार्यक्रमात सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. अधिवेशनास मोठ्या संख्येने पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक आ. शाम खोडे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, निलेश सोमाणी, स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, मुख्य समन्वयक डॉ. हरिष बाहेती, सहस्वागताध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील, कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, ड. भारती सोमाणी, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, कार्याध्यक्ष अभय खेडकर, विभाग अध्यक्ष सुनिल फुलारी, जिल्हाध्यक्ष किरण क्षार, शहर जिल्हाध्यक्ष पप्पु घुगे, इलेक्ट्रॉनिक मीडिया जिल्हाध्यक्ष राम धनगर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष गणेश देवगावकर, डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष कैलास महाजन यांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी केले आहे. याशिवाय विदर्भ समन्वयक मोहित कर्नावट, उपाध्यक्ष संजय कडोळे, प्रदेश सदस्य पंकज सोनोने, रवि अंभोरे, नारायण आरू, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती जिल्हाध्यक्ष प्रफुल बानगावकर, जिल्हा उपाध्यक्ष समीर देशपांडे, अमोल अघम, संतोष गुल्हाणे, राजकुमार ठाकूर, संजय राठी, शाम अपूर्वा, बंडू राठोड, शिवाजी खडसे, ड. सुरेश टेकाळे, सौ. वृषाली टेकाळे, गोरखनाथ भागवत, विजय घोंगडे आदींची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वाराला विदर्भ केसरी स्व. ब्रजलाल बियाणी यांचे नाव देण्यात आले असून परिसराला वैकुंठधाम वासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी यांचे नाव देण्यात आले आहे.

या राज्यस्तरीय अधिवेशनाद्वारे पत्रकार संघटनात्मक बळकटी, पत्रकारांच्या समस्या, बदलते माध्यमविश्व आणि मूल्यनिष्ठ पत्रकारितेवर व्यापक चर्चा होणार असल्याने राज्यभरातील पत्रकारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

## परतूर येथील शेख नवाज सर यांची मुलगी शेख आईजा नवाज वय : ७ वर्ष हिने आपल्या पहिला रोजा



**परतुर (समर्थ गांवकरी)**

मौलाना आझाद कॉलोनी परतूर येथील शेख नवाज सर यांची मुलगी शेख आईजा नवाज वय : ७ वर्ष हिने आपल्या इस्लामिक परंपरेनुसार आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला इतक्या लहान वयात दिवसभर अन्न व पाणी न घेता प्रचंड जिद्द आणि श्रद्धाच्या बळावर तिने आपला पहिला रोजा पूर्ण केल्यामुळे सर्वत्र कौतुक होत आहे लहान वयात दाखवलेली त्याची सहनशीलता आणि धार्मिक भावना प्रेरणादायी ठरत आहे या विशेष प्रसंगी त्याचे संपूर्ण शेख परिवाराने तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आईजा च्या या पहिल्या रोजाबद्दल परिसरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## दुसरी नोटीस बजावली; जामखेडमधील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला वेग

### अवधूत पवार यांच्या उपोषणानंतर प्रशासन सज्ज मात्र साखळी उपोषण सुरूच ; महामार्ग ५४८-डीवरील टपऱ्यांना अंतिम इशारा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर जामखेड नगरपरिषद यांनी अतिक्रमणधारकांना दुसरी नोटीस बजावून कारवाईला वेग दिला आहे. बस स्थानकापासून शासकीय दूध संघापर्यंत दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून अवघा एक किलोमीटरचा रस्ता पार करण्यासाठी नागरिकांना तब्बल दोन तासांचा वेळ लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी मार्गावरील इतर ठिकाणची अतिक्रमणे यापूर्वी हटविण्यात आली असली, तरी शहरातील अतिक्रमणे अद्याप कायम असल्याने प्रशासनावर टीका होत होती. सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी केलेल्या उपोषणानंतर प्रशासनाने हालचालींना वेग दिल्याचे चित्र आहे.

महामार्गाची शासकीय हद्द रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस प्रत्येकी १५ मीटर (५० फूट) इतकी आहे. या हद्दीत उभारलेली नियमबाह्य बांधकामे, टपऱ्या व इतर अतिक्रमणे प्रस्तावित रस्ते रुंदीकरणास अडथळा ठरत आहेत. परिणामी शहरातील विविध विकासकामे रखडली असून उजनी धरणातून होणारी पाणीपुरवठा योजना देखील ठप्प असल्याची नागरिकांची तक्रार आहे. दरम्यान, नगरपरिषद प्रशासन, पोलीस प्रशासन व तहसील प्रशासन अतिक्रमण हटविण्यासाठी सज्ज झाले असून दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी टपरीधारकांना दुसरी नोटीस बजावण्यात आली आहे. संबंधितांनी स्वखर्चाने अतिक्रमणे काढून प्रशासनाला सहकार्य करावे, अशी आवाहनात्मक भूमिका प्रशासनाने घेतली आहे.जामखेडकर नागरिकांनी शहराच्या विकासासाठी अतिक्रमण हटविण्याची कारवाई तातडीने पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



## अल्पवयीन विद्यार्थिनीवरील अत्याचारप्रकरणी शिक्षक विशाल बारगळला २० वर्षे सश्रम कारावास!

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी शिक्षक विशाल लक्ष्मण बारगळ यास विशेष न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. या निर्णयामुळे पीडितेला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

दि. १८ ऑगस्ट २०१८ रोजी पीडिता ही नेहमीप्रमाणे आरोपीच्या स्पोकन इंग्लिश वर्गात गेली होती. आरोपीने इतर विद्यार्थ्यांना वर्ग संपल्याचे सांगून घरी पाठवले व पीडितेला पाठांतर झाले नाही असे कारण देत वर्गात थांबवले. त्यानंतर तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक अत्याचार करण्यात आला. घरी परतल्यानंतर पीडितेने संपूर्ण प्रकार आईला सांगितल्यानंतर प्रकरण उघडकीस आले. याबाबत तोफखाना पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ४१५/२०१८ नोंदविण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३७६(३), ३७७ तसेच पोक्सो कायद्यान्वये कलम ३, ४, ७, ८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

प्राथमिक तपास पीएसआय स्वाती देवडकर यांनी केला. त्यानंतर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पुढील तपास तत्कालीन डीवायएसपी नगर शहर संदीप मिटके यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यांना पोलीस हवालदार राजू भालसिंग यांनी सहाय्य केले.

न्यायालयीन सुनावणीत पीडिता, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुप्रिया जगताप, जन्म नोंदणी अधिकारी तसेच तपासी अधिकारी संदीप मिटके यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. वैद्यकीय तपासणी अहवाल व न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेचा अहवाल निर्णायक पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात आला. सरकारी पक्षातर्फे ॲड. अनंत चौधरी यांनी प्रभावी युक्तिवाद केला. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पीएसआय संजय चव्हाण व पोलीस कॉन्स्टेबल रेश्मा अडसूळ यांनी काम पाहिले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व सादर पुरावे विचारात घेऊन डॉ. यू. जे. मोरे यांनी आरोपी विशाल लक्ष्मण बारगळ यास भारतीय दंड संहिता कलम ३७६(३) अंतर्गत २० वर्षे सक्तमजुरी व रु. १०,००० दंड (दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त सक्तमजुरी) तसेच कलम ३७७ अंतर्गत ५ वर्षे सक्तमजुरी व रु. ३,००० दंड (दंड न भरल्यास १ महिना अतिरिक्त सक्तमजुरी) अशी शिक्षा सुनावली. या निकालामुळे अल्पवयीनांवरील अत्याचारप्रकरणी कठोर शिक्षा देण्याबाबत न्यायालयाची भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे.











## मुंबई पोलिसांच्या १२९० वाहनांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

, दि. २६: मुंबईत आणि महानगर परिसरात घडलेल्या गुन्ह्याच्या ठिकाणी जलद गतीने पोहोचणे, १०० आणि ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर आलेल्या तक्रारीच्या कॉलवर विनाविलंब पोहोचणे यासाठी मुंबई पोलीस दलात १२९० नवीन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे.

नरिमन पॉईंट येथील मुरली देवरा चौकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून आज या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाला गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (प्रशासन) एस. जयकुमार यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी उपस्थित होते. या वाहनांमध्ये ६५७ दुचाकी ६३३ चार चाकी वाहनांचा समावेश आहे. चार चाकी वाहनांमध्ये स्कॉर्पिओ आणि मोठी अर्मेनिया वाहने आहेत. सध्या मुंबई पोलिसांचा हेल्पलाइनवर आलेल्या तक्रारीचा प्रतिसाद वेळ ५.३० मिनिटे आहे. हा प्रतिसाद वेळ या वाहनांच्या समावेशामुळे निश्चितच आणखी कमी होणार आहे. गुन्ह्याची जलद गतीने उकल करून पीडितांना तातडीने न्याय देणे या वाहनांमुळे शक्य होणार आहे.

मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत एकूण ९० पोलीस स्टेशन कार्यरत आहेत. या प्रत्येक पोलीस स्टेशनला पाच दुचाकी, चार स्कॉर्पिओ आणि मोठी अर्मेनिया वाहने एक अशाप्रकारे एकूण दहा वाहने देण्यात येणार आहेत. ही चार चाकी वाहने मोबाईल डाटा टर्मिनल, जीपीएस यंत्रणा, व्हेईकल ट्रेकिंग यंत्रणा आधी आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त आहेत.

## अवैध वाळू तस्करी आणि वाळूतस्कारांच्या मुजोरीचा मुद्दा अधिवेशनात; आमदार काशिनाथ दाते सरांचा ठाम आवाज

**पारनेर (समर्थ गांवकरी)**





गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात पारनेर तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करांच्या मुजोरीतून वाढत चाललेल्या अपघातांच्या घटनांचा गंभीर मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

आमदार दाते सरांनी लक्ष वेधताना सांगितले की, तालुक्यातील काही नदीपात्रांमधून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असून ओव्हरलोड ट्रक व डंपर वेगाने धावत असल्याने रस्ते धोकादायक बनले आहेत. अशाच एका पारनेर तालुक्यातील बोकनकवाडी ते वासुंदा रोडवर घडलेल्या अपघाताच्या घटनेत भरधाव डंपरने संतोष नऱ्हे नावाच्या दुचाकीस्वारास धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर चालकाने सबंधित जखमी तरुणास मदत न करता रस्त्यावरच डंपरमधील वाळू खाली करून पसार झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचेही त्यांनी सभागृहात नमूद केले.

या अपघातामुळे केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नाही, तर अवैध वाळू वाहतुकीचा धोका किती भीषण आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले. दाते सरांनी प्रश्न उपस्थित केला की, अशा घटनांवर आळा घालण्यासाठी प्रशासनाने नेमकी कोणती पावले उचलली आहेत? दोषींवर कठोर कारवाई होणार का? तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार का?

अवैध वाळू उपसा केवळ महसुलाचे नुकसान करत नाही, तर सामान्य नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण करतो, असे स्पष्ट करत आमदार काशिनाथ दाते सरांनी या प्रकरणात सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. मतदारसंघातील जनतेच्या सुरक्षेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी कठोर व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी सभागृहात ठामपणे मांडली.

> अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत, काही प्रकरणांत गुन्हे दाखल करून वाहनांवर दंडात्मक कारवाई व जप्ती करण्यात येऊन कडक कारवाई करण्यात येतील. अपघातप्रकरणीही तपास सुरू असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, कोणालाही सोडलं जाणार नाही.
>
> ना. चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री

## कळसूबाई -हरिश्चंद्रगड अभयारण्याचा ४० वा वर्धापन दिन वाकी शाळेत उत्साहात पार पडला

### वन्यजीव विभाग नाशिक व आऊल कॉन्झर्वेशन फाउंडेशन यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

**राजूर /सचिन लगड (समर्थ गांवकरी)**





वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ नुसार कळसूबाई -हरिश्चंद्रगड अभयारण्य अधिघोषीत करण्यात आले . उत्तर पश्चिम घाटात अंदाजे ३६२ किमी क्षेत्रफळात विस्तारलेल्या अहिल्यानगर -नाशिक -ठाणे - पुणे या जिल्हयांच्या सरहद्दीवरील अकोले तालुक्यातील हे वैशिष्टयपूर्ण अभयारण्य आहे . या अभयारण्याचा ४० वा वर्धापन दिन वन्यजीव संरक्षण विभाग नाशिक व आऊल कॉन्झर्वेशन फाउंडेशन यांच्या पुढाकाराने जि.प. प्राथ . शाळा वाकी ता. अकोले येथे उत्साहात पार पडला . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय व्यवस्थापन समितीचे शशिकांत जाधव यांनी भुषविले . कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वनपाल शंकर लांडे, प्रमुख मार्गदर्शक जेष्ठ जैवविविधता तज्ज्ञ रमाकांत डेरे उपस्थित होते . क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व आदयक्रांतिकारक सह्याद्रीचा रक्षक राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेचे पुजण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली . आढळा - प्रवरा -मुळा नदयांच्या खोऱ्यानी व्यापलेला व भंडारदरा धरणाच्या थंडगार निसर्गरम्य सानिध्यात , कळसूबाई शिखराचा उत्तुंग वारा अंगावर खेळवणारा आणि अलंग , मदन ,बितनगड , पट्टाकिल्ला ,पाभरगड, शिरपूंजा गड, कोंबडकिल्ला यांना वेगाने स्पर्श करणारा पाऊस झेलणारा हा परिसर . कुडल , सिरस , पांगारा ,कराप, अशिंद, धामण ,सादडा, अर्जुन , बेहडा , जांभूळ , चांदवा , बहावा , कुंभळ,खारवेल, गुलचावी , आवळी अशा दुर्मिळ व औषधी वनस्पतींचे वरदान लाभलेले , मुंगूस , सांबर , ससा , वानर , कोल्हे, रानमांजर , रानडुक्कर , तरस,माकड, खोकड, खार , ससाण ,भेकर,सायाळ , उदमांजर, बिबट ,निलगाय, राज्यप्राणी -शेखरू यांचे वास्तव्य आणि विविध दुर्मिळ पक्षी , किटक यांचे नैसर्गिक अस्तित्व असलेले हे अभयारण्य आहे.

आजचे विद्यार्थी हे भारत मातेचे भावी जबाबदार नागरिक असून , तुम्ही वन्यजीव संपदा संरक्षणासाठी सज्ज व्हायला हवे . निसर्गाने मोकळ्या हाताने बहाल केलेली संपदा , अन्नसाखळी आणि परागीभवन या प्रक्रिया टिकल्या तरच मानव जात भविष्यात टिकेल असे ज्ञानामृत वनपाल शंकर लांडे यांनी विद्यार्थ्यांना दिले. वनपाल शंकर लांडे यांनी मुलांना अभयारण्यातील वेगवेगळ्या जंगली पशु - पक्ष्यांची , वनस्पती व किटकांची आणि त्यांच्या अधिवासाची ओळख करून दिली .बिबट्यापासून संरक्षण कसे करावे याबाबत उपयुक्त माहिती देताना संकटग्रस्त जीवसृष्टीबद्दल चिंता व्यक्त केली . त्यांच्या संवर्धनासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले .मुलांनी त्यांच्या मार्गदर्शनाला चर्चात्मक प्रतिसाद देत आयुष्यातील भूत दया या संस्काराचे धडे घेतले. तसेच त्यांची वन्यजीव सृष्टीविषयी माहिती ऐकूण खऱ्याअर्थाने आपल्याला नवे ज्ञान व योग्य दिशा मिळाल्याचे समाधान त्यांच्यात दिसले.

अभयारण्य टिकलं पाहिजे , जगवलं पाहिजे . आपल्याला जगण्यासाठी हे किती महत्त्वाचे आहे . मंदिरं , नदया , चांगल्या -चांगल्या गोष्टी मानवाच्या कल्याणासाठी आहेत , असं हे अभयारण्य आहे . त्यासाठी तीन गोष्टी कराव्यात.

पहिली गोष्ट -तोडायचं नाही म्हणजे झाडं लावली ती वाढवली पाहिजेत . दुसरी गोष्ट - काहीपण मारायचं नाही आणि तिसरी गोष्ट -जाळायची नाही कारण जाळल्याणे प्रत्येक गोष्ट नष्ट होते . असे अनमोल वन्यजीवांविषयी ज्ञान रमाकांत डेरे यांनी मुलांना दिले .आपला छंद जोपासताना सर्वांसाठी आपला आदर्श निर्माण होईल असे जीवन जगावे असेच त्यांचे या उपस्थित मान्यवरांचे व्यक्तिमत्व .

कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी भंडारदरा रुपेश गावित व वनपरिक्षेत्र अधिकारी सी.एस. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने वन्यजीव प्रेमी व पक्षी निरीक्षक रोहिदास डगळे यांच्या विशेष प्रयत्नातून आणि शिक्षणक्षेत्राविषयी असलेल्या आवडीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता . यावेळी वनरक्षक प्रविण साळुंखे , वनरक्षक अरुण कोरडे , वनकर्मचारी वसंत भागडे , माजी अध्यक्ष दत्तू सगभोर , ग्रामपंचायत सदस्य राम सगभोर , शा .व्य . समिती सदस्य आत्माराम सगभोर , वंदना सगभोर ,प्राजक्ता विदयालयाच्या माधुरी बोरसे , वाळीबा सदगीर,महेश रेवगडे ,वाकी शाळेच्या उपाध्यापिका यशोदा ढगे उपस्थित होते . शाळेचे मुख्याध्यापक भिमा कोकतरे यांनी सर्वांचे स्वागत केले. उपक्रमशील शिक्षक अर्जुन तळपाडे यांनी सुत्रसंचालन केले .वन्यजीव विभाग व आऊल कॉन्झर्वेशन फाउंडेशन कडून या निमित्त मुलांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

शालेय व्यवस्थापन कमिटी शिक्षणतज्ज्ञ धिरेंद्र सगभोर यांनी सर्वांचे आभार मानले . सदर नाविण्यपूर्ण उपक्रमाचे मान्हेरे केंद्रप्रमुख सुनिल घुले यांनी कौतुक करत अभिनंदन केले .

# कळसूबाई -हरिश्चंद्रगड अभयारण्याचा ४०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

## वन्यजीव विभाग नाशिक व आऊल कॉन्झर्वेशन फाउंडेशन यांच्या पुढाकाराने कार्यक्रमाचे आयोजन

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ नुसार कळसूबाई -हरिश्चंद्रगड अभयारण्य अधिघोषीत करण्यात आले. उत्तर पश्चिम घाटात अंदाजे ३६२ किमी क्षेत्रफळात विस्तारलेल्या अहिल्यानगर -नाशिक -ठाणे - पुणे या जिल्हयांच्या सरहद्दीवरील अकोले तालुक्यातील हे वैशिष्टयपूर्ण अभयारण्य आहे. या अभयारण्याचा ४० वा वर्धापन दिन वन्यजीव संरक्षण विभाग नाशिक व आऊल कॉन्झर्वेशन फाउंडेशन यांच्या पुढाकाराने जि.प. प्राथ. शाळा वाकी ता. अकोले येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय व्यवस्थापन समितीचे शशिकांत जाधव यांनी भुषविले. कार्यक्रमाचे प्रमुख



पाहुणे वनपाल शंकर लांडे, प्रमुख मार्गदर्शक जेष्ठ जैवविविधता तज्ज्ञ रमाकांत डेरे उपस्थित होते. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व आदयक्रांतिकारक सह्याद्रीचा रक्षक राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेचे पुजण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. आढळा - प्रवरा -मुळा नदयांच्या खोऱ्यानी व्यापलेला व भंडारदरा धरणाच्या थंडगार निसर्गरम्य सानिध्यात, कळसूबाई शिखराचा उत्तुंग वारा अंगावर खेळवणारा आणि अलंग, मदन ,बितनगड, पट्टाकिल्ला ,पाभरगड, शिरपूंजा गड, कोंबडकिल्ला यांना वेगाने स्पर्श करणारा पाऊस झेलणारा हा परिसर. कुडल, सिरस, पांगारा ,कराप, अशिंद, धामण ,सादडा, अर्जुन, बेहडा, जांभूळ, चांदवा, बहावा, कुंभळ,खारवेल, गुलचावी , आवळी अशा दुर्मिळ व औषधी वनस्पतींचे वरदान लाभलेले , मुंगूस, सांबर, ससा, वानर, कोल्हे, रानमांजर, रानडुक्कर, तरस,माकड, खोकड, खार, ससाण ,भेकर,सायाळ, उदमांजर, बिबट ,निलगाय, राज्यप्राणी -शेखरू यांचे वास्तव्य आणि विविध दुर्मिळ पक्षी , किटक यांचे नैसर्गिक अस्तित्व असलेले हे अभयारण्य आहे.

आजचे विदयार्थी हे भारत मातेचे भावी जबाबदार नागरिक असून, तुम्ही वन्यजीव संपदा संरक्षणासाठी सज्ज व्हायला हवे. निसर्गाने मोकळ्या हाताने बहाल केलेली संपदा, अन्नसाखळी आणि परागीभवन या प्रक्रिया टिकल्या तरच मानव जात भविष्यात टिकेल असे ज्ञानामृत वनपाल शंकर लांडे यांनी विद्यार्थ्यांना दिले. वनपाल शंकर लांडे यांनी मुलांना अभयारण्यातील वेगवेगळ्या जंगली पशु - पक्ष्यांची, वनस्पती व किटकांची आणि त्यांच्या अधिवासाची ओळख करून दिली .बिबट्यापासून संरक्षण कसे करावे याबाबत उपयुक्त माहिती देताना संकटग्रस्त जीवसृष्टीबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांच्या संवर्धनासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले .मुलांनी त्यांच्या मार्गदर्शनाला चर्चात्मक प्रतिसाद देत आयुष्यातील भूत दया या संस्काराचे धडे घेतले. तसेच त्यांची वन्यजीव सृष्टीविषयी माहिती ऐकूण खऱ्याअर्थाने आपल्याला नवे ज्ञान व योग्य दिशा मिळाल्याचे समाधान त्यांच्यात दिसले. अभयारण्य टिकलं पाहिजे, जगवलं पाहिजे. आपल्याला जगण्यासाठी हे किती महत्त्वाचे आहे. मंदिरं , नदया, चांगल्या -चांगल्या गोष्टी मानवाच्या कल्याणासाठी आहेत, असं हे अभयारण्य आहे . त्यासाठी तीन गोष्टी कराव्यात . पहिली गोष्ट -तोडायचं नाही म्हणजे झाडं लावली ती वाढवली पाहिजेत. दुसरी गोष्ट - काहीपण मारायचं नाही आणि तिसरी गोष्ट -जाळायची नाही कारण जाळल्याणे प्रत्येक गोष्ट नष्ट होते . असे अनमोल वन्यजीवांविषयी ज्ञान रमाकांत डेरे यांनी मुलांना दिले .आपला छंद जोपासताना सर्वांसाठी आपला आदर्श निर्माण होईल असे जीवन जगावे असेच त्यांचे या उपस्थित मान्यवरांचे व्यक्तिमत्व. कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी भंडारदरा रुपेश गावित व वनपरिक्षेत्र अधिकारी सी.एस. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने वन्यजीव प्रेमी व पक्षी निरीक्षक रोहिदास डगळे यांच्या विशेष प्रयत्नातून आणि शिक्षणक्षेत्राविषयी असलेल्या आवडीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी वनरक्षक प्रविण साळुंखे, वनरक्षक अरुण कोरडे, वनकर्मचारी वसंत भागडे, माजी अध्यक्ष दत्तू सगभोर, ग्रामपंचायत सदस्य राम सगभोर, शा .व्य . समिती सदस्य आत्माराम सगभोर, वंदना सगभोर ,प्राजक्ता विदयालयाच्या माधुरी बोरसे, वाळीबा सदगीर,महेश रेवगडे ,वाकी शाळेच्या उपाध्यापिका यशोदा ढगे उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक भिमा कोकतरे यांनी सर्वांचे स्वागत केले.उपक्रमशील शिक्षक अर्जुन तळपाडे यांनी सुत्रसंचालन केले .वन्यजीव विभाग व आऊल कॉन्झर्वेशन फाउंडेशन कडून या निमित्त मुलांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.शालेय व्यवस्थापन कमिटी शिक्षणतज्ज्ञ धिरेंद्र सगभोर यांनी सर्वांचे आभार मानले.

# मुख्याधिकाऱ्यांच्या नोटीसला ठेंगा

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

बसस्थानक येथील बांधकामावरून नवा वाद पेटला असून मुख्याधिकारी रफीक कंकर यांनी बजावलेल्या कायदेशीर नोटीसला कंत्राटदाराने जुमानले नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याची चर्चा शहरात रंगली आहे. प्रशासनाने अनधिकृत बांधकाम तात्काळ थांबवण्याचे आदेश देऊनही प्रत्यक्ष काम सुरू असल्याने प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नगर परिषद प्रशासनाने संबंधित प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाईची तयारी केली होती. तरीही ठेकेदार ए आर कंट्रक्शन यांच्याकडून आदेश धुडकावल्याचा आरोप होत आहे. सार्वजनिक प्रकल्प असल्याने या प्रकरणात राजकीय दबाव आहे



की कंत्राटदाराची मुजोरी, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ च्या प्रकल्पातील हे बांधकाम वादाच्या भोवऱ्यात सापडले असून अनधिकृत काम सुरू राहिल्यास प्रशासनाला पोलिस बंदोबस्तात कारवाई करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, अशीही शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, नोटीस देऊनही कंत्राटदाराने आदेश न पाळल्यास आर्थिक दंड, काम बंद आदेश तसेच अनधिकृत बांधकामावर बुलडोझर कारवाईसारखे कठोर पाऊल उचलले जाऊ शकतील का, अशी कायदेशीर वर्तुळात चर्चा आहे. आता प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र पर्यटनाचा विभागाचा पुढाकार

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांचा राष्ट्रीय स्तरावर प्रभावी प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या पुढाकारातून महाबळेश्वर येथे B2B (Business to Business) फोकस्ड FAM (Familiarization) टूरचे यशस्वी आयोजन करण्यात आले. राज्यातील पर्यटन क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या या उपक्रमाला विविध राज्यांतील टूर ऑपरेटर्स व पर्यटन तज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशी माहिती कोकण विभागीय पर्यटन उपसंचालक यांनी दिली आहे. महाराष्ट्र पर्यटन संचालनाल, स्थानिक हॉटेल असोसिएशन, टूर ऑपरेटर्स आणि ट्रॅव्हल एजंट्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत महाबळेश्वर येथे B2B फोकस्ड FAM (Familiarization) टूरचे आयोजन करण्यात आले होते.

# अवैध वाळू तस्करी आणि वाळूतस्कारांच्या मुजोरीचा मुद्दा अधिवेशनात

■ आमदार काशिनाथ दाते सरांचा ठाम आवाज

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात पारनेर तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करांच्या मुजोरीतून वाढत चाललेल्या अपघातांच्या घटनांचा गंभीर मुद्दा सभागृहात उपस्थित केला. आमदार दाते सरांनी लक्ष वेधताना सांगितले की, तालुक्यातील काही नदीपात्रांमधून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असून ओव्हरलोड ट्रक व डंपर वेगाने धावत असल्याने रस्ते धोकादायक बनले आहेत. अशाच एका पारनेर तालुक्यातील



बोकनकवाडी ते वासुंदा रोडवर घडलेल्या अपघाताच्या घटनेत भरधाव डंपरने संतोष नव्हे नावाच्या दुचाकीस्वारास धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर चालकाने सबंधित जखमी तरुणास मदत न करता रस्त्यावरच डंपरमधील वाळू खाली करून पसार झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचेही त्यांनी सभागृहात नमूद केले.या अपघातामुळे केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नाही, तर अवैध वाळू वाहतुकीचा धोका किती भीषण आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले. दाते सरांनी प्रश्न उपस्थित केला की, अशा घटनांवर आळा घालण्यासाठी प्रशासनाने नेमकी कोणती पावले उचलली आहेत? दोषींवर कठोर कारवाई होणार का? तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येणार का?

अवैध वाळू उपसा केवळ महसुलाचे नुकसान करत नाही, तर सामान्य नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण करतो, असे स्पष्ट करत आमदार काशिनाथ दाते सरांनी या प्रकरणात सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला. मतदारसंघातील जनतेच्या सुरक्षेसाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी कठोर व दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी सभागृहात ठामपणे मांडली.

अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी विशेष पथके कार्यरत आहेत, काही प्रकरणांत गुन्हे दाखल करून वाहनांवर दंडात्मक कारवाई व जप्ती करण्यात येऊन कडक कारवाई करण्यात येतील. अपघातप्रकरणीही तपास सुरू असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, कोणालाही सोडलं जाणार नाही.

**- ना. चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

# पारनेर शहराच्या विकास आराखड्याला शासनमान्यता



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर शहराच्या विकास आराखड्याला शासनाची मान्यता मिळाली असून, हे शहराच्या नियोजित आणि शाश्वत विकासासाठी ऐतिहासिक क्षण ठरले आहे. शिवसेना नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा दीर्घकाळ प्रलंबित राहिलेला मुद्दा मार्गी लागला.

गेल्या अनेक वर्षांपासून पारनेर शहराचा विकास आराखडा (डीपीआर) प्रलंबित होता. यामुळे शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा, आरक्षणे आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर परिणाम होत होता. सुजित झावरे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या विशेष प्रयत्नांमुळे गेल्या दोन महिन्यांपूर्वी आराखड्याला प्राथमिक मंजुरी मिळाली होती. आता शासकीय सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३१(१) अन्वये बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी विकास योजना अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. याबाबतचे शासन परिपत्रक जारी झाले असून, आता ही योजना कायदेशीरदृष्ट्या लागू होणार आहे.

पारनेरचा विकास आराखडा मंजूर व्हावा म्हणून गेल्या दोन महिन्यापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून त्यांच्याकडून आराखडा मंजूर करून घेतला. त्यामुळे पारनेरच्या भविष्यातील विकासाचा प्रश्न नक्कीच सुटला आहे. आता प्रक्रियेनुसार विकास आराखड्याला शासकीय मान्यता सुद्धा मिळाली असून खऱ्या अर्थाने पारनेर शहराच्या विकासाचा मार्ग आता परिपूर्णपणे मोकळा झाला आहे.

**- सुजित झावरे पाटील, ( मा. उपाध्यक्ष जिल्हा परिषद अहिल्यानगर)**

■ शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांची माहिती

मंजूर आराखड्यात रस्ते विस्तार, सार्वजनिक उद्याने, शाळा-आरोग्य केंद्रे, बाजारपेठा, नाले-सफाई आणि भविष्यातील लोकसंख्यावाढीचा विचार करून संतुलित विकासाची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे शहराचा सर्वांगीण आणि सुबक विकास साधता येईल. भविष्यातील विस्ताराला गती मिळेल आणि अनियोजित बांधकामे रोखता येतील.

# 'फुला' तून उलगडणार मुरळीची कथा!!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

अस्सल मराठी मातीतल्या वाघ्या-मुरळीची संघर्षमय कथा आगामी 'फुला' चित्रपटातून मोठ्या पडद्यावर पहायला मिळणार आहे. नुकतेच या चित्रपटाचं पोस्टर खंडेरायाच्या साक्षीने जेजुरी येथे वाघ्या-मुरळी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मार्तंड साठे यांच्या हस्ते लॉंच करण्यात आले याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते , दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थितीत होती. हा चित्रपट येत्या १७ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे पै. अजित शिवाजी जाधव यांनी "फुला" या चित्रपटाची निर्मिती केली असून शिवशर्विल मूव्ही आणि बोधी सिनेमा यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे.अभिषेक जावीर दिग्दर्शित या चित्रपटाची पटकथा रवीकिरण जावीर यांनी लिहिली आहे.

# जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त भाषेचे प्राचीनत्ववर व्याख्यान

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा आणि ऐतिहासिक वारशाचा गौरव करण्यासाठी 'मराठी भाषेचे प्राचीनत्व' (मराठी भाषेच्या जन्मापासून आजवरची स्थित्यंतरे) या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार श्रीकांत बोजेवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन उद्या शुक्रवार दिनांक 27/02/2026 रोजी करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी 4.00 वाजता महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे होणार आहे. या कार्यक्रमास महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी उपस्थित राहणार आहेत.




मराठी भाषेची उत्पत्ती, तिची प्राचीन मुळे, संत साहित्याची परंपरा, शिवकालीन आणि पेशवेकालीन काळातील भाषेची भूमिका, तसेच आधुनिक काळातील मराठी भाषेचे बदलते स्वरूप यांचा सखोल आढावा ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत बोजेवार हे आपल्या व्याख्यानातून घेणार आहेत. मराठी भाषेचा उगम, तिचे संस्कृत आणि प्राकृत भाषांशी असलेले नाते, विविध शिलालेख आणि ऐतिहासिक दस्तऐवजांतील उल्लेख, तसेच ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांच्या साहित्यामुळे भाषेला लाभलेले वैभव यावरही ते प्रकाश टाकणार आहेत. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून संस्कृती, परंपरा आणि अस्मितेची वाहक आहे, हा संदेश या व्याख्यानातून अधोरेखित होणार आहे. जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि प्रसार यासाठी समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी, साहित्यप्रेमींनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# हिमालया बेबीकेअरचे नवे पॅकेजिंग सादर

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

भारतातील विश्वासार्ह बेबी केअर ब्रँड हिमालया बेबीकेअरने आपल्या जेंटल बेबी केअर उत्पादनांसाठी नव्या पॅकेजिंग डिझाइनची घोषणा केली आहे. पर्यावरणपूरक उपक्रमांचा भाग म्हणून सादर करण्यात आलेले हे पॅकेजिंग अधिक आकर्षक, सोयीस्कर आणि जबाबदारीने डिझाइन करण्यात आले आहे. कंपनीच्या सस्टेनेबिलिटी आराखड्यानुसार, या नव्या पॅकेजिंगमुळे पुढील पाच वर्षांत सुमारे 500 टन प्लास्टिकचा वापर कमी होणार असून दरवर्षी अंदाजे 100 टन प्लास्टिक वाचणार आहे. पर्यावरणावर सकारात्मक परिणाम घडवण्याच्या उद्देशाने हिमालया बेबीकेअर सातत्याने प्रयत्न करत असल्याचे कंपनीने सांगितले. आज पालक खरेदी




करताना उत्पादन पर्यावरणासाठी किती सुरक्षित आहे, याचा विचार करतात. मुलांचे सुरक्षित आणि निरोगी भविष्य लक्षात घेऊन अधिक जबाबदारीने उत्पादने निवडण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

या बदलाचे प्रतीक म्हणून हिमालया बेबीकेअरने नवीन पॅकेजिंग सादर केले आहे. नव्या पॅकेजिंगच्या लॉंचसाठी कंपनीने एक प्रभावी डिजिटल फिल्महीं सादर केली आहे. या फिल्ममध्ये प्लास्टिक कचऱ्याची वाढती समस्या आणि त्याचा पुढील पिढीवर होणारा परिणाम याबाबत पालकांमधील संवाद दाखवण्यात आला आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात ज्येष्ठ चित्रपट गीतकार, अभिनेते, पटकथा व संवाद लेखक मा. श्री. बाबासाहेब सौदागर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांच्या पत्नी अभिनेत्री सौ. कविता सौदागर यांच्यासह त्यांनी कार्यक्रमाला शोभिवंत केला.



बाबासाहेब सौदागर हे मराठी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम व्यक्तिमत्त्व असून, त्यांनी ८० हून अधिक चित्रपटांसाठी गीतलेखन केले आहे. 'मी सिंधुताई सपकाळ', 'शिवा', 'राजमाता जिजाऊ' अशा अनेक चित्रपटांसाठी त्यांनी गाणी लिहिली आहेत. तसेच अनेक मालिका, नाटके आणि चित्रपटांमध्ये अभिनयही केला आहे. त्यांना कवीश्रेष्ठ ग.दि. माडगूळकर सर्वोत्कृष्ट गीतकार पुरस्कारासह अनेक सन्मान मिळाले आहेत. निसर्गकवी म्हणूनही ते ओळखले जातात.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते व्यासपीठाची पूजा झाली. विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, नाट्य व इतर कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले, ज्याने उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सिताराम खिलारी यांनी गुणवंत प्राध्यापक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करून महाविद्यालय व संस्थेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.बाबासाहेब सौदागर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून मार्गदर्शन करताना सांगितले, "शैक्षणिक वर्षात गुण कमी मिळाले तरी नाराज होऊ नका. तुमच्यातील कलागुण ओळखा. प्रत्येकामध्ये काही ना काही कलाकार दडलेला असतो. त्याला ओळखून पुढे जा. शैक्षणिक यशाबरोबरच कलागुण विकसित केल्यास जीवन समृद्ध होते." त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने विद्यार्थ्यांमध्ये नवउत्साह निर्माण झाला. समारंभात शैक्षणिक गुणवंत विद्यार्थी, क्रीडा स्पर्धांतील विजेते, विविध सांस्कृतिक व इतर स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. गुणवंत प्राध्यापकांचेही विशेष अभिनंदन झाले. कार्यक्रमाचे कार्याध्यक्ष व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. लक्ष्मण कोठावळे यांनी वर्षभरातील विविध विभागातील उपक्रमांचा अहवाल सादर केला. क्रीडा अहवाल प्रा. अनुराधा गायके व प्रा. दिव्या शीलवंत यांनी वाचला. सूत्रसंचालन डॉ. विश्वास गवारी, प्रा. संकेत ठाणगे, डॉ. जिजाभाऊ घुले व प्रा. रेश्मा सोनावणे यांनी केले. आभार प्रा. वीरेंद्र धनशेट्टी यांनी मानले.

याप्रसंगी कला शाखा प्रमुख डॉ. विजय सुरोशी, विज्ञान शाखा प्रमुख प्रा. नामदेव वाल्हेकर, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. सुदाम वीर, एन.सी.सी. प्रमुख प्रा. शांता गडगे, कार्यालय प्रमुख श्री. सावकार काकडे, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम केवळ स्नेहसंमेलन नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा उत्सव ठरला. अशा उपक्रमांमुळे महाविद्यालयातील सांस्कृतिक व शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध होत असल्याचे दिसून आले.

# छत्रपती शिक्षण मंडळ, पडघा यांचा शिवशौर्यगाथेत सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक!

## मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन पोवाडा स्पर्धेत विद्यार्थ्यांची दिमाखदार कामगिरी

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघा येथील छत्रपती शिक्षण मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन पोवाडा गायन स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत अभिमानास्पद यश संपादन केले आहे. "शिवचरित्रावर आधारित – शिवशौर्यगाथा" या विषयावर घेण्यात आलेल्या महाअंतिम फेरीत विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात




आले होते. इतिहासातील शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेची गाथा पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत करत पडघा येथील नॅक मूल्यांकन प्राप्त कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार सादरीकरण केले.

या विजयी पथकात प्रमुख गायिका कु. आरती संताजी जाधव हिच्यासह हर्षिता पाटील, वैष्णवी भोईर, तेजस्विनी सावंत, जतीन साळवी, सुमित जाधव यांनी सहगायन केले. ढोलकी वादनाची जबाबदारी राहुल डवले यांनी समर्थपणे सांभाळली. संपूर्ण सादरीकरणात आवाजातील ताकद, लयबद्धता आणि ऐतिहासिक संदर्भांची अचूक मांडणी यामुळे परीक्षकांनी मंडळाला प्रथम क्रमांक बहाल केला.

या यशामागे प्राध्यापिका नीता भोईर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांनी विद्यार्थ्यांना पोवाड्याची परंपरा, उच्चारांची शुद्धता आणि रंगमंचावरील आत्मविश्वास याबाबत विशेष प्रशिक्षण दिले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सुप्रसिद्ध लोकशाहीर यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले. सलग दुसऱ्या वर्षी मिळालेल्या या यशामुळे छत्रपती शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गिरनार यात्रा हिंदूंची पवित्र यात्रा : गजेंद्र सोनवणे

## गिरनार यात्रेकरूंचा मंदिर अर्चक एवं पुरोहित आयामा तर्फे सत्कार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

दरवर्षी गिरनार यात्रेसाठी हिंदू समाजातील भाविक मोठ्या संख्येने जात असतात.गुजरात येथील गिरनार यात्रेमध्ये दहा हजार पायरी पूर्ण केल्यानंतर भगवान श्री दत्तात्रय यांच्या पादुकांचे दर्शन मिळते.या ठिकाणी नेमिनाथ मंदिर, गोरक्षनाथ मंदिराची अखंड धूनी सुरु आहे.गिरनार यात्रा हिंदूंची पवित्र यात्रा आहे.असे प्रतिपादन विहिंपचे मंदिर अर्चक एवं पुरोहित आयामाचे प्रांत टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे यांनी केले आहे. गिरनार यात्रेकरू अहिल्यानगर येथे आले असता दिल्लीगेट येथील श्री कुबेर गणेश मंदिरात विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक एवं पुरोहित आयामाचे वतीने भाविकांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत मंदिर अर्चक एवं पुरोहित आयामाचे प्रांत टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे,विहिंपचे



जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,अरुण खिची,गणेश पलंगे, भाजपचे राजेंद्र मंगलाराम, किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे, जनकल्याण रक्त केंद्राचे जनसंपर्क अधिकारी शरद बळे आदींसह गिरनार यात्रेकरू सुरेंद्र सोनवणे, महेश कुलकर्णी, अमोल भंडारे, सागर रोहोकले, सुचित भळगट, प्रकाश देशमुख, सागर मुळे, विवेक भिडे,तेजस वैद्य, मकरंद भिडे, मनीष भंडारे आदींचा सत्कार करण्यात आला. महेश कुलकर्णी म्हणाले, चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे कार्यकर्ते दरवर्षी अनेक धार्मिक कार्यक्रम करीत असतात. यावर्षी गिरनार यात्रा पूर्ण करून धार्मिक ऊर्जा घेऊन साप्ताहिक आरती केंद्र पुन्हा जोमाने सुरू करतील. गिरनार यात्रे दरम्यान द्वारका, द्वारका बेट,रुक्मिणी मंदिर नागेश्वर महादेव,सोरटी सोमनाथ व गिरनार मंदिर या पवित्र ठिकाणी यात्रेकरूंचे दर्शन झाले आहे.मन प्रसन्न करणारी आणि दैवी शक्ती देणारी व आपल्या मनोकामना पूर्ण करणारी अशी ही यात्रा आहे. हिंदू भाविकांनी गिरनार यात्रेसाठी मोठ्या संख्येने जावे.असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



ठाणे : दिवा स्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या दरम्यान मुख्य रस्त्यावर ट्रक रस्त्यावर खचल्याची घटना घडली असून सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारावर कारवाईची मागणी दिवा मनसेने केली आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

# शेख आईजा नवाज हिचा पहिला रोजा

**परतुर: (समर्थ गांवकरी)**



मौलाना आझाद कॉलोनी परतूर येथील शेख नवाज सर यांची मुलगी शेख आईजा नवाज वय : 7 वर्ष हिने आपल्या इस्लामिक परंपरेनुसार आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला इतक्या लहान वयात दिवसभर अन्न व पाणी न घेता प्रचंड जिद्द आणि श्रद्धाच्या बळावर तिने आपला पहिला रोजा पूर्ण केल्यामुळे सर्वत्र कौतुक होत आहे लहान वयात दाखवलेली त्याची सहनशीलता आणि धार्मिक भावना प्रेरणादायी ठरत आहे या विशेष प्रसंगी त्याचे संपूर्ण शेख परिवाराने तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आईजा च्या या पहिल्या रोजाबद्दल परिसरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कुरुंद्यात नाली बांधकामात 'महा-भ्रष्टाचार'चा स्फोट?

## कोट्यवधींचा निधी धोक्यात; नाल्यांना पडल्या भेगा, ग्रामस्थ संतप्त

**हिंगोली : (समर्थ गांवकरी)**

वसमत तालुक्यातील कुरुंदा येथे पूरस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या नाली बांधकामावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गावाला दरवर्षी त्रस्त करणाऱ्या पुराच्या पाण्यापासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने वसमत विधानसभेचे आमदार राजू भैय्या नवघरे यांनी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी आणून नदी खोलीकरण व नाली बांधकामाची कामे मार्गी लावली. मोठ्या अपेक्षांनी सुरू झालेले हे काम आता मात्र संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. ग्रामस्थांचा आरोप आहे की, गुत्तेदार व बांधकाम विभागातील संबंधित अधिकारी-इंजिनिअर यांच्या संगनमताने अत्यंत निकृष्ट दर्जाचे



साहित्य वापरून काम उरकून घेतले जात आहे. नाली बांधकाम सुरू असतानाच सिमेंटचे प्रमाण कमी, वाळू-मुरूम दर्जाहीन आणि काँक्रीट कमकुवत असल्याचे दिसून येत आहे. इतकेच नव्हे, तर नुकत्याच झालेल्या बांधकामाला ठिकठिकाणी मोठ्या भेगा पडू लागल्या असून काही ठिकाणी नाली सरळ न बांधता वाकडी-तिकडी करण्यात आल्याचेही समोर आले आहे. "साध्या घराच्या बांधकामालाही भेगा पडत नाहीत, मग कोट्यवधींच्या नालीला एवढ्या लवकर तडे कसे?" असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. कामाबाबत वेळोवेळी संबंधित इंजिनिअरांना सूचना देऊनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप आहे. उलट, "काम दर्जेदारच आहे," असे सांगून तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

कुरुंदा सरपंचांनीही संबंधित विभागाकडे लेखी तक्रार करून काम दर्जेदार पद्धतीने करण्याची मागणी केली होती. मात्र त्यानंतरही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने गावकऱ्यांचा रोष वाढला आहे. भविष्यात ही नाली पूरपाण्याचा तडाखा सहन करू शकेल का? की पहिल्याच पावसात कोसळून कोट्यवधींचा निधी पाण्यात जाईल? अशी भीती व्यक्त होत आहे.

# बोटा येथे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

**बोटा : (समर्थ गांवकरी)**

विद्या निकेतन इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर यांच्या वतीने "आर्टिफिशियल इंटेलिजेंस व नियामक अनुपालन : फार्मास्युटिकल आणि हेल्थकेअर इंडस्ट्रीतील परिवर्तन" या समकालीन विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. औषधनिर्माण व आरोग्य क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे होत असलेल्या बदलांचा तसेच नियामक अनुपालन प्रक्रियेतील डिजिटल परिवर्तनाचा सर्वांगीण आढावा या परिषदेत घेण्यात आला. देशभरातील प्राध्यापक, संशोधक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यास विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील फार्मसी विभागाचे अधिष्ठाता डॉ.



विशाल पांडे, संदीप विद्यापीठ, नाशिक येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. सुमित देवरे,डॉ. संदीप हापसे, डॉ. सतीश पोलशेट्टीवार, श्री. विलास सावंत, डॉ. अविनाश ठाणगे व डॉ. अक्षय खैरनार यांनी मार्गदर्शन केले.

मान्यवरांनी AI आधारित नियामक अनुपालन, डेटा इंटिग्रिटी, ऑटोमेशन, रिस्क-बेस्ड मॉनिटरिंग आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या विषयांवर सखोल विवेचन केले. औषध उद्योगातील बदलत्या तंत्रज्ञानामुळे संशोधन, गुणवत्ता हमी व नियामक प्रक्रियेत नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी तांत्रिक सत्रे, संशोधनाधारित व्याख्याने, शोधनिबंध सादरीकरण व पोस्टर प्रेझेंटेशन आयोजित करण्यात आले. शोधनिबंध व पोस्टर सादरीकरणासाठी डॉ. विजयकुमार वाकळे, डॉ. तुषार डुकरे, डॉ. शीतल गोसावी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्याचे शास्त्रीय मूल्य, नावीन्यपूर्णता व सादरीकरण कौशल्य यांच्या आधारे सखोल परीक्षण केले. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेचे सल्लागार श्री. बी. जी. शेखर पाटील, सचिव श्री. रामदास पोखरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विद्युलता शेखर पाटील, समन्वयक डॉ. आदित्य शेखर पाटील तसेच कॅम्पस डायरेक्टर दीपक रहाणे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

परिषदेच्या यशस्वी आयोजनामागे प्राचार्य डॉ. किरण शिंदे व संपूर्ण शिक्षकवृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ही परिषद शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील दुवा अधिक बळकट करणारी ठरली असून, औषधनिर्माण व आरोग्य क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावी वापराला नवी दिशा देणारी ठरली. विद्यार्थ्यांनी परिषदेमुळे संशोधनाची प्रेरणा व उद्योगातील आधुनिक प्रवाहांची सखोल माहिती मिळाल्याची भावना व्यक्त केली.

# ५८ वर्षीय महिलेला पुन्हा चालण्याची क्षमता

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

Medicover KLE Hospital, पुणे येथे मान-मणक्याच्या गंभीर आजारामुळे चालण्यात अडचण येणाऱ्या ५८ वर्षीय महिलेवर यशस्वीपणे अत्याधुनिक शस्त्रक्रिया करण्यात आली असून उपचारानंतर तिच्या चालण्याच्या क्षमतेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. सदर रुग्णाला गेल्या दोन महिन्यांपासून चालताना तोल जाणे व असंतुलन जाणवत होते. तपासणीनंतर तिला C4 ते D2 या मणक्यांदरम्यान OPLL (Ossification of Posterior Longitudinal Ligament) मुळे झालेला सर्व्हायकल मायेलोपॅथी हा गंभीर आजार असल्याचे निदान झाले. या आजारात मणक्यातील मज्जारज्जूवर दाब येत असल्याने हालचालींवर परिणाम होतो.

# न्यू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे परिक्षेत यश




**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

शासनातर्फे नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या परिक्षेत न्यू हायस्कूलच्या विद्यार्थ्यानी यश संपादन केले आहे. महालगाव (ता. वैजापुर) येथील न्यू हायस्कूलमधून शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती परिक्षेसाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी भक्ती राजेंद्र काळे, वैष्णवी अवचित मालोदे,, पायल विलास काळे, मयूरी जितेंद्र मोईन, श्रृती योगेश मलीक, काजल दादासाहेब मोरे, पंकज दादासाहेब गायकवाड, सार्थक चांगदेव पंडीत, साई किशोर गलांडे या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून यशस्वी विद्यार्थ्यांना १२ वी पर्यतच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना राजेश राठोड, महेश डुकरे, विठ्ठल गलांडे या शिक्षकांनी अनमोल मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य अविनाश पाटिल गलांडे,मुख्याध्यापक जे.बी. नारळे,भाऊसाहेब झिंजुर्डे, दत्तात्रय नांगरे, साईनाथ आहेर, रामेश्वर शेळके, आण्णासाहेब मोईन, डॉ. प्रकाश शेळके, गोरख चव्हाण, रजनीकांत नजन, प्रकाश आल्हाट, मारोती जाधव, अमोल मलिक, योगेश पवार, नवनाथ गायकवाड, श्रीमती अर्चना पाटोळे,'सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ आदिनी अभिनंदन केले.

# पारनेर तालुक्यात जावयाने सासऱ्याला संपवलं, नगर जिल्ह्यात खळबळ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पत्नी गेल्या वर्षभरापासून नांदत नसल्याने आणि सासरे वारंवार वाद घालून सव्वा वर्षाच्या मुलीला मारून टाकण्याची धमकी देत असल्याच्या रागातून जावयाने सासऱ्याचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पारनेर तालुक्यातील ढवळपुरी शिवारातील डोंगर परिसरात घडलेल्या या खून प्रकरणाची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून जावयास त्याच्या मित्रासह अटक करण्यात आली आहे. दि. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास ढवळपुरी शिवारातील डोंगर परिसरात रामदास निवृत्ती सोनवणे (वय ५५, रा. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा अज्ञात व्यक्तीने गळा आवळून खून केल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी मयताचे भाऊ तुळशीराम निवृत्ती सोनवणे (रा. सुलतानपूर, ता. जुन्नर, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ तपास करून आरोपींना जेरबंद करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, अंमलदार अतुल लोटके, फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, अमृत आढाव, आकाश काळे, विशाल तनपुरे आदींचे विशेष पथक स्थापन करण्यात आले.

# नागीणविषयी जागरूकतेचा अभाव; अर्धे प्रौढ डॉक्टरांशी चर्चा करत नाहीत

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नागीण (शिंगल्स) हा वेदनादायक आजार असूनही भारतातील सुमारे निम्मे प्रौढ त्याच्या प्रतिबंधाबाबत डॉक्टरांशी चर्चा करत नाहीत, अशी धक्कादायक बाब एका जागतिक सर्वेक्षणातून समोर आली आहे. ५० वर्षांवरील आणि दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त प्रौढांवर नागीणीचा मोठा परिणाम होत असल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

नागीण कृती सप्ताह (२३ फेब्रुवारी–१ मार्च २०२६) निमित्त करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात नागीण झालेल्या ४३% भारतीयांनी दैनंदिन जीवनात अडथळा आणणारी तीव्र वेदना अनुभवली असल्याचे सांगितले. तर तीनपैकी एका व्यक्तीने या आजारामुळे काम किंवा सामाजिक कार्यक्रमांपासून



दूर राहावे लागल्याचे नमूद केले. मूत्रपिंडाचे आजार (सीकेडी) आणि हृदयविकार (सीव्हीडी) असलेल्या रुग्णांमध्ये नागीणीचा सर्वाधिक परिणाम दिसून आला.

नागीण हा व्हेरिसेला-झोस्टर विषाणूमुळे होणारा आजार असून वय वाढल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे त्याचा धोका वाढतो. हा आजार प्रामुख्याने शरीराच्या एका बाजूला पुरळ आणि वेदनादायक फोडांच्या स्वरूपात दिसून येतो. तज्ज्ञांच्या मते, नागीण टाळण्यासाठी लसीकरण हा प्रभावी उपाय आहे.

सर्वेक्षणानुसार, दीर्घकालीन आजार असूनही चारपैकी एक व्यक्तीला नागीणीबाबत फारशी माहिती नाही. तसेच सुमारे ४८% लोकांनी कधीही डॉक्टरांशी नागीणविषयी चर्चा केलेली नसल्याचे सांगितले. मधुमेह आणि हृदयविकार असलेल्या रुग्णांमध्ये हा संवाद आणखी कमी असल्याचे आढळले.

गैरसमजही मोठ्या प्रमाणावर आढळून आले. काहींना त्यांच्या जुनाट आजारांचा रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होत नाही असे वाटते, तर अनेकांना चांगले आजार व्यवस्थापन केल्यास संसर्ग टाळता येतो असे वाटते. परिणामी, नागीणीच्या जोखमीबाबत जागरूकतेचा अभाव दिसून येतो.



जीएसके इंडियाच्या वैद्यकीय कामकाजाच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ. शालिनी मेनन म्हणाल्या की, "भारतात आयुर्मान वाढत असले तरी मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि इतर दीर्घकालीन आजारांमुळे वृद्धांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. त्यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. मात्र, दीर्घकालीन आजार आणि रोगप्रतिकारक आरोग्य यातील संबंधांबाबत जागरूकता कमी आहे."

भारतामध्ये सध्या ६० वर्षांवरील लोकसंख्या सुमारे १५३ दशलक्ष असून ती २०५० पर्यंत ३४७ दशलक्षांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यापैकी ७५ दशलक्षांहून अधिक वृद्ध किमान एका दीर्घकालीन आजारासह जगत आहेत. वाढते वय आणि जुनाट आजारांमुळे नागीणीचा धोका अधिक वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

वृद्धत्व आणि दीर्घकालीन आजारांचा वाढता परिणाम आरोग्यसेवा खर्च, उत्पादकता घट आणि दीर्घकालीन काळजीच्या गरजा वाढवू शकतो. त्यामुळे प्रतिक्रियाशील उपचारांऐवजी प्रतिबंधक आरोग्यसेवेकडे वळणे गरजेचे असल्याचे सर्वेक्षणात अधोरेखित करण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, प्रौढांमधील लसीकरण आणि नागीणविषयी जागरूकता वाढवण्यासाठी डॉक्टर आणि रुग्णांमधील संवाद नियमित होणे आवश्यक आहे. यामुळे टाळता येण्याजोगे दुःख कमी होऊन जीवनमान सुधारण्यास आणि आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी करण्यास मदत होऊ शकते.

# दिव्यांगांसाठी कला, क्रीडा व विशेष शाळेचे भव्य नियोजन!

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अपंग संजीवनी सोशल वेल्फेअर फाउंडेशन तर्फे कोपरखैरणे, सेक्टर २३, भूखंड क्रमांक २० येथे दिव्यांग बांधवांसाठी कला, क्रीडा व विशेष शिक्षण केंद्र सुरू करण्याचे महत्त्वाकांक्षी नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे दिव्यांग मुलांना सर्वांगीण विकासाची सुवर्णसंधी उपलब्ध होणार असून त्यांच्या बौद्धिक, शारीरिक व सामाजिक प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे. या उपक्रमात विशेष दिव्यांग तज्ज्ञ डॉ. गणेश जोशी यांचे मोफत आरोग्य तपासणी व



मार्गदर्शनाच्या स्वरूपात विशेष सहकार्य लाभणार आहे. त्यांच्या वैद्यकीय मार्गदर्शनामुळे दिव्यांग मुलांच्या आरोग्य व विकास प्रक्रियेला मोठा हातभार लागणार आहे. संस्थेचे डायरेक्टर श्री सुरेश दुधाने यांचे दिव्यांगांसाठी स्वतंत्र कला, क्रीडा व विशेष शाळेचे स्वप्न या प्रकल्पाद्वारे साकार होत आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरवला जात आहे. या केंद्रामध्ये विविध कला प्रकार, क्रीडा प्रशिक्षण, विशेष शिक्षण तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार असून मुलांचा आत्मविश्वास वाढवून त्यांना स्वावलंबी बनविण्यावर भर दिला जाणार आहे. या प्रकल्पासाठी श्री संतोष गोळे, श्री सचिन जाधव, सौ. शोभा काळे, श्री रामचंद्र रंगराव पाटील (बी.एस्सी., बी.एड.), सौ. सुवर्णा रामचंद्र पाटील (समाजसेविका) व कु. ऋतुजा रामचंद्र पाटील (बी. एस्सी. रसायनशास्त्र, समाजकार्य पदव्युत्तर) यांचा मोलाचा पाठिंबा लाभत आहे. तसेच विशेष सहकार्य म्हणून ज्ञानविकास संस्था संस्थापक ॲडव्होकेट श्री पी. सी. पाटील, सचिव श्री चंद्रकांत पाटील व श्री प्रसाद पाटील यांचे मार्गदर्शन लाभत असून त्यांच्या योगदानामुळे प्रकल्प अधिक सक्षम व प्रभावी होणार आहे. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून कोपरखैरणे परिसरात दिव्यांग मुलांसाठी एक आदर्श विकास केंद्र उभे राहणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच सामाजिक समावेशनालाही मोठी चालना मिळणार आहे. संस्थेच्या वतीने समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उद्योगसंस्था व हितचिंतकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेस महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, सुरक्षा अधिकारी घनश्याम फर्डे, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...




### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची बैठक संपन्न

पुणे (स. गांवकरी) : नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या पुणे शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ही बैठक शहराध्यक्ष संजय सोनवणे आणि पक्षाचे राज्य सचिव बाळासाहेब जानराव यांच्या नेतृत्वाखाली पुणे महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका निशा मानवतकर, माजी नगरसेवक, संतोष आरडे, सुधीर वाघमोडे, रेणुका चलवादी, जयदेव रंधवे, हुलगेश चलवादी, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, टी. आर. तांबोळी, राजेंद्र चुव्हाण, नीलेश रोकडे, सुधीर जगताप, ॲड. भाऊसाहेब गोफणे, लिंबा कावरे, मनीषा मोहिते, कुणाल चावरे, विक्रांत कानडे आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी नवनिर्वाचित सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. पक्षाचे तीन उमेदवार निवडणूकीत यश संपादन करू शकले नाहीत त्यातील दोन उमेदवारांच तर अवघ्या दोनशे पेक्षा कमी मतांनी पराभव झाला, या पराभवाची कारण मीमांसा यावेळी करण्यात आली. तसेच या बैठकीत शहरातील संघटनात्मक बळकटीकरण, आगामी निवडणुकांची तयारी तसेच समाजसेवेशी संबंधित विविध प्रकल्पांवर सखोल चर्चा करण्यात आली. स्थानिक विकासासाठी नव्या विकासात्मक योजनांची आखणी, शहरात पक्षाची असलेली भक्कम ताकद लक्षात घेऊन विकासकामांचा आराखडा तयार करणे, तसेच पंचवार्षिक कार्यक्रम निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा आणि एसआरए चे प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. सर्व जाती-धर्मातील नागरिकांना एकत्र आणत सामाजिक ऐक्य वाढवणे आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करणे हेच आपले प्रमुख ध्येय असल्याची भावना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच निवडणूकीत पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार न करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याचे सर्वाधिकार अध्यक्षांना देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.



### किस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग येथे KeyFest 2026 उत्साहात संपन्न

पुणे (स. गांवकरी) : किस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे वार्षिक महोत्सव "KeyFest 2026" अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा हा बहुआयामी महोत्सव सांस्कृतिक, क्रीडा तसेच राष्ट्रीय अभिमान जागवणाऱ्या उपक्रमांनी समृद्ध ठरला. या मुख्य महोत्सवांतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम "Encore 2026" आणि क्रीडा स्पर्धा "Key Karandak 2026" यांचे भव्य आयोजन करण्यात आले. "Encore 2026" मध्ये नृत्य, गायन, नाट्याविष्कार, समूह सादरीकरणे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. पारंपरिक दिन, बॉलिवूड दिन, चॉकलेट डे, मिसमॅच डे आणि ट्विन्स डे अशा थीम डेजमुळे संपूर्ण परिसर रंगतदार आणि उत्साही वातावरणाने फुलून गेला. आकर्षक वेशभूषा आणि कल्पक सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.



### औंध-बोपोडी प्रभागातील महत्त्वाच्या प्रकल्पांना आयुक्तांची भेट

पुणे (स. गांवकरी) : पुणे महानगरपालिकाचे आयुक्त नवल किशोर राम यांनी उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या विनंतीवरून आज औंध-बोपोडी प्रभागातील विविध रखडलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी सर्व प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या पाहणी दौऱ्यात उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्यासह स्थानिक नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका सपना छाजेड, नगरसेविका भक्ती गायकवाड, तसेच आरपीआयचे शिवाजीनगर मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, ज्ञानेश्वर जाविर व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# "आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा का नाही?"

## आमदार काशिनाथ दाते सरांचा ज्वलंत प्रश्न



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सुरू असलेल्या अधिवेशनात राज्यातील बहुतांश आदिवासी बांधवांना अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध नसल्याचा गंभीर मुद्दा सभागृहात उपस्थित केला. कर्जत तालुक्यातील पाटेवाडी येथे एका आदिवासी महिलेच्या निधनानंतर अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध नसल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीकडे लक्ष वेधत त्यांनी शासनाला जाब विचारला. आ. दाते सरांनी सभागृहात बोलताना संबंधित महिलेचे निधन २२ सप्टेंबर २०२४ रोजी झाले.

मात्र स्मशानभूमी उपलब्ध नसल्याने अंत्यविधी उशिरा पार पडला. या घटनेमुळे आदिवासी समाजाच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न निर्माण झाला असून, अशा घटना राज्यात इतरत्र घडत आहेत का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली या प्रश्नाद्वारे आमदार काशिनाथ दाते सरांनी आदिवासी समाजाच्या सन्मानाचा व मूलभूत अधिकारांचा मुद्दा प्रभावीपणे मांडला."

अंत्यसंस्कारासाठीही जागा न मिळणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे; शासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत," अशी ठाम भूमिका त्यांनी सभागृहात मांडत सामाजिक न्यायाचा मुद्दा अधोरेखित केला.

मतदारसंघातील तसेच राज्यातील वंचित घटकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून आमदार दाते सर पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.

> आ. दाते यांनी संवेदनशील प्रश्न केला पाटेवाडी येथे पूर्वी वनविभागाच्या जागेत अंत्यविधी केले जात होते; मात्र एका तक्रारीमुळे संबंधित प्रकरणात अडचण निर्माण झाली. ग्रामपंचायतीने तत्काळ ठराव करून स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तहसीलदारांकडे सादर केला आहे. तसेच जिल्ह्यात ज्या गावांमध्ये स्मशानभूमी उपलब्ध नाही, अशा गावांची माहिती संकलित करण्यात आली असून विशेष मोहिमेद्वारे जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मूलभूत सुविधा योजनेंतर्गत स्मशानभूमीचे काम मंजूर असल्यास त्या गावांना प्राधान्य देण्यात येईल. जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांना यासंदर्भात पत्राद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. **- ना. जयकुमार गोरे, ग्रामविकास मंत्री**

# किरीट सोमैयांच्या 'अतिरेकी' आरोपांवर खुलासा करा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भाजपचे माजी खासदार किरीट सोमैया यांनी मालेगाव (जि. नाशिक) येथे 'बांगलादेशी अतिरेकी' संदर्भात केलेल्या वक्तव्यांवरून राजकीय वाद निर्माण झाला असून, या प्रकरणी नाशिक जिल्हा पोलीस प्रशासन व जिल्हाधिकारी यांनी तातडीने खुलासा करावा, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, सोमैया यांनी मालेगावमध्ये माध्यमांसमोर अतिरेक्यांबाबत संख्येसह गंभीर आरोप केले असून हा प्रकार अत्यंत संवेदनशील आहे. त्यांनी सुमारे ४,६०० बांगलादेशी अतिरेकी घुसल्याचा दावा केल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे या वक्तव्यांची सत्यता तपासून प्रशासनाने अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, असे त्यांनी म्हटले. तिवारी यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर सोमैया यांच्याकडे इतकी गंभीर माहिती होती, तर ती संबंधित पोलीस यंत्रणा आणि प्रशासनाला आधी का देण्यात आली नाही? पोलीस प्रशासन या बाबत अनभिज्ञ कसे राहिले, याचाही खुलासा व्हायला हवा, असे ते म्हणाले. या प्रकरणात मालेगाव व नाशिक जिल्हा प्रशासनाने सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, तसेच गरज भासल्यास सोमैया यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन त्यांच्या आरोपांची पडताळणी करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. काँग्रेसकडून असा आरोप करण्यात आला की, अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात भीती, संशय आणि तणावाचे वातावरण निर्माण होऊ शकते.

# 'गेरा'स इम्पेरियम गेटवे'ला थेट मेट्रो प्रवेशमार्ग सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे तसेच देश-विदेशात प्रीमियम रिअल इस्टेट प्रकल्पांसाठी ओळखल्या जाणाऱ्या गेरा डेव्हलपमेंट्स प्रा. लि. यांनी पिंपरी-चिंचवडमधील 'गेरा'स इम्पेरियम गेटवे' या व्यावसायिक प्रकल्पाला थेट भोसरी मेट्रो स्थानकाशी जोडणारा समर्पित प्रवेशमार्ग सुरू केला. या उपक्रमामुळे हा प्रकल्प शहरातील मेट्रोशी एकात्मिक जोडणी असलेला पहिल्या व्यावसायिक संकुलांपैकी एक ठरला आहे. उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्रॉपर्टी विभागाचे एजीएम मनोज दंडारे प्लॅनिंग विभागाचे डीजीएम मिहिर कुलकर्णी तसेच गेरा डेव्हलपमेंट्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलजार मल्होत्रा उपस्थित होते. नवीन प्रवेशमार्ग सुरू झाल्यानंतर प्रवासी, कर्मचारी व व्यावसायिकांना भोसरी मेट्रो स्थानकातून थेट प्रकल्पात प्रवेश मिळणार असून 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी'ची समस्या मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. त्यामुळे कार्यालयीन प्रवास अधिक जलद, सोयीस्कर आणि



वेळ वाचवणारा होणार असल्याचे सांगण्यात आले. मनोज दंडारे म्हणाले की, पुण्यातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मेट्रो प्रकल्प राबवण्यात आला असून अशा प्रकारचे ट्रान्झिट-ओरिएंटेड डेव्हलपमेंट शहराच्या शहरी रचनेत महत्त्वाचा बदल घडवतील. सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि खासगी विकास यांची सांगड घातल्यास भविष्योन्मुख व्यावसायिक क्षेत्रांची निर्मिती शक्य होते. गुलजार मल्होत्रा यांनी सांगितले की, आधुनिक व्यावसायिक प्रकल्प हे केवळ इमारती नसून ते जोडणी, कार्यक्षमता आणि टिकाऊपणावर आधारित असले पाहिजेत. थेट मेट्रो प्रवेशामुळे प्रकल्पाचे व्यावसायिक मूल्य वाढते, कंपन्यांसाठी आकर्षण निर्माण होते आणि पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळते.

# सुजित पाटलांचा नेमका संबंध काय?



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर शहराच्या विकास आराखड्याच्या मंजुरीवरून राजकीय श्रेयवादाचा नवा अंक सुरू झाला असून, नगरसेवक अशोक चेडे यांनी थेट नाव घेत विरोधकांवर तोफ डागली आहे. "मंत्रालयातून अधिसूचना कोणी आणली, यावर श्रेय ठरत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून विकास आराखड्याचे खरे श्रेय केवळ आमदार काशिनाथ दाते यांचेच आहे. सुजित झावरे पाटील यांचा या आराखड्याशी सबंधच काय?" असा थेट सवाल चेडे यांनी पत्रकार परिषदेत केला.

विकास आराखड्याच्या मंजुरीनंतर काही नगरसेवकांनी फटाके फोडल्याचा उल्लेख करत चेडे यांनी टोला लगावला. "आमच्या नेतृत्वाने मंजूर केलेल्या आराखड्यासाठी विरोधकांनी फटाके फोडायचे कारणच

## "मेहनत दुसऱ्याची... आणि मिरवणूक आपली"...

> "कोणत्याही संवैधानिक पदावर नसताना विकास आराखड्याचे श्रेय घेणे हे जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्यासारखे आहे, पारनेर नगरपंचायतीशी काडीचाही संबंध नसताना फुकटचा बडेजाव मिरवण्यासाठी कागदी घोडे नाचविणे कोणालाही मान्य होणार नाही," **- अशोक चेडे, नगरसेवक पारनेर**

■ नगरसेवक अशोक चेडे यांचा बंदा सवाल

काय? न केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे," अशी टीका त्यांनी केली.

चेडे यांनी विकास आराखड्याचा इतिहास उलगडताना सांगितले की, नगरपंचायत स्थापनेनंतर तत्कालीन आमदार तथा विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांनी या प्रक्रियेला प्रारंभ केला. त्यानंतर तत्कालीन आमदार व विद्यमान खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून आराखड्याला गती मिळाली आणि मसुदा शासनाकडे सादर करण्यात आला.

पुढे विधानसभा निवडणुकीत काशिनाथ दाते विजयी झाल्यानंतर त्यांनी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करत मंजुरी मिळवली. "लोकप्रतिनिधी म्हणून ती त्यांची जबाबदारी होती आणि त्यांनी ती पार पाडली. त्यामुळे मंजुरीचे खरे श्रेय आमदार दाते यांचेच आहे," असे चेडे यांनी ठामपणे सांगितले.

विकास आराखड्याच्या मंजुरीचा मुद्दा आता श्रेयवादाच्या भोवऱ्यात अडकताना दिसत आहे. विकासाच्या कामांपेक्षा "मी केले, मी आणले" या घोषणांवरच भर दिला जात असल्याची खंतही नागरिकांतून व्यक्त होत आहे. चेडे यांच्या या धारदार वक्तव्यामुळे पारनेरच्या राजकारणात नव्या वादळाची चाहूल लागली असून, विकासाच्या नावावर होणाऱ्या श्रेयवादाला आता कोण लगाम लावणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जामखेडमधील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला वेग

## अवधूत पवार यांच्या उपोषणानंतर प्रशासन सज्ज मात्र साखळी उपोषण सुरूच; महामार्ग ५४८-डीवरील टपऱ्यांना अंतिम इशारा

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर जामखेड नगरपरिषद यांनी अतिक्रमणधारकांना दुसरी नोटीस बजावून कारवाईला वेग दिला आहे. बस स्थानकापासून शासकीय दूध संघापर्यंत दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून अवघा एक किलोमीटरचा रस्ता पार करण्यासाठी नागरिकांना तब्बल दोन तासांचा वेळ लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी मार्गावरील इतर ठिकाणची अतिक्रमणे यापूर्वी हटविण्यात



आली असली, तरी शहरातील अतिक्रमणे अद्याप कायम असल्याने प्रशासनावर टीका होत होती. सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांनी केलेल्या उपोषणानंतर प्रशासनाने हालचालींना वेग दिल्याचे चित्र आहे. महामार्गाची शासकीय हद्द रस्त्याच्या मध्यापासून दोन्ही बाजूस प्रत्येकी १५ मीटर (५० फूट) इतकी आहे. या हद्दीत उभारलेली नियमबाह्य बांधकामे, टपऱ्या व इतर अतिक्रमणे प्रस्तावित रस्ते रुंदीकरणास अडथळा ठरत आहेत. परिणामी शहरातील विविध विकासकामे रखडली असून उजनी धरणातून होणारी पाणीपुरवठा योजना देखील ठप्प असल्याची नागरिकांची तक्रार आहे.दरम्यान, नगरपरिषद प्रशासन, पोलीस प्रशासन व तहसील प्रशासन अतिक्रमण हटविण्यासाठी सज्ज झाले असून दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी टपरीधारकांना दुसरी नोटीस बजावण्यात आली आहे. संबंधितांनी स्वखर्चाने अतिक्रमणे काढून प्रशासनाला सहकार्य करावे, अशी आवाहनात्मक भूमिका प्रशासनाने घेतली आहे.जामखेडकर नागरिकांनी शहराच्या विकासासाठी अतिक्रमण हटविण्याची कारवाई तातडीने पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)